


ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

ऑगस्ट २०१०     मूल्य १० रुपये




## कार विकार आणि ध्वनिप्रदूषण.....



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001


# नुकतीच प्रसिद्ध झालेली पुस्तके




पहिल्या प्रयत्नातच कुशल खेळाडूप्रमाणे कुठल्याही खेळाची लय भीमरावांना साधत असे. या दैवी देणगीला कठोर कष्टांची जोड देऊन भीमरावांनी फूटबॉल बहरवला. या खेळाचा स्थायीभाव आहे, त्या खेळाची विलक्षण गती. भीमरावांना सहजसाध्य असलेले अनेक खेळ होते, परंतु फूटबॉलकडे लक्ष द्यायचं असं न ठरवताही भीमराव फूटबॉलमध्येच रमले. कारण या खेळाची नैसर्गिक गती आणि भीमरावांच्या व्यक्तिमत्त्वातील असामान्य वेग ह्यातील ताळमेळ सहज होता. फूटबॉलमध्ये नावारूपास येणं हे त्यांच्या अंतर्बाह्य व्यक्तिमत्त्वाचं सहजसुंदर प्रकटीकरण होतं. फूटबॉलशी त्यांचं नातं ही सर्वात नैसर्गिक गोष्ट होती.

**मूल्य १२० रुपये • सवलतीत ७० रुपये**

नवीन आवृत्ती




चिं. त्र्यं. खानोलकर हे त्यांच्या साहित्याप्रमाणेच एक गूढ व झपाटून टाकणारं व्यक्तिमत्त्व होतं. प्रतिभेचं देणं लाभलेल्या खानोलकरांना उत्कटतेनं जगण्याची मोठी किंमत मोजावी लागली. त्या धडपडीचा समग्र अनुभव म्हणजे हे वेधक शैलीत लिहिलेलं चरित्र. खानोलकरांच्या साहित्याबद्दल ते कुतूहल निर्माण करतं. या साहित्याकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोण देतं. परिचितांनाही इथं खानोलकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही अज्ञात पैलू दिसतील!

**मूल्य १८० रुपये • सवलतीत ११० रुपये**

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**ऑगस्ट २०१०**
**वर्ष ३० वे, अंक आठवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**

मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

'आवाज की दुनिया के दोस्तो' अशी कार्यक्रमाची सुरुवात एखादा निवेदक करतो आणि कर्णमधुर गाणी ऐकवतो तेव्हा त्या मनोरंजनाचा आनंद आपण घेतो. तेवढ्यापुरती ठीक असलेली आवाज की दुनिया आता सामाजिक वातावरण बिघडवण्याइतकी वाढली आहे. भाषेच्या, जातीच्या, प्रांताच्या, वंशाच्या अशा कुठल्याही कारणाला पुढे करून 'आवाज' देणारे गल्ली ते दिल्ली बोकाळलेत. जिथे समाजाच्या भल्याचा विचार मांडला जाण्याची अपेक्षा असते अशा विधानसभागृहांत 'कानाखाली आवाज' काढून अजब तऱ्हेनं प्रश्न सोडवण्याचा (वाढवण्याचा!) प्रकार आपण पाहत असतो. या साऱ्या आवाजांना जनतेचे कान किटले आहेत. मात्र जनतेचे कैवारी केवळ 'आपद्धर्म' म्हणून असे आवाज देत असतात. तसं करण्यात आपल्याला आनंद नाही या भूमिकेत राहून त्याचे सर्व फायदे मात्र पदरात पाडून घेण्याची व्यवहार्यता पाळतात. आपल्याला हे समजतं, पण त्याकडे दुर्लक्ष करण्याचं कसबही त्या आवाजासोबतच आपण आत्मसात केलंय. कारण त्याचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होत नाही.

मात्र विविध उत्सव, समारंभ (आताच्या भाषेत इव्हेंट), सभा इथे लावल्या जाणाऱ्या अवाढव्य स्पीकरच्या आवाजांनी हैदोस घातलाय. हे सारं सार्वजनिक असल्यानं जनसहभाग त्यात आहे. या आवाजाची सवय, त्यात गुंतल्यामुळे, आपल्यात सहज रुजतेय. इतकी, की घरातही मोठ्या आवाजात टीव्ही अथवा गाणी लावल्याशिवाय 'एन्जॉय' केल्याचं समाधान आपल्याला होत नाही. बदलत्या जीवनशैलीला अनुसरून आलेला बदलता ठेका केवळ डोलण्याइतका चालत नाही, त्यावर सर्वांग थिरकलं पाहिजे! घराघरातल्या मुलांना तासन् तास टीव्हीसमोर बसून (बसवून) बालपणापासूनच कानठळ्या बसण्याचं सामर्थ्य निर्माण केलं जात आहे. साहजिकच, घरात बोलणंही मोठ्यानं होतं. याशिवाय, घराबाहेर वाजणारे मोटारगाड्यांचे आवाज जीवनाचं अंग झाले आहेत!

'कार विकार' वाढतो आहे. त्यातून निर्माण होणारं प्रदूषण, पादचाऱ्यांचे हक्क याबाबत थोडी ओरड होते. तेल कंपन्या, मोटार उद्योजक व सरकार यांचे लागेबांधे आपणास कळत नाहीत. कारण त्यांच्या संगनमताला आवाज नसतो! त्याबाबत विद्याधर दाते यांनी इंग्रजीत पुस्तक लिहिलं आहे. त्याचा वृत्तांत अंकात आहे.

या साऱ्याचं गांभीर्य आपल्या लक्षात येत नाही इतकं आयुष्य गतिमान झालंय. पाऊस पडू दे म्हणून विठ्ठलाला साकडं घालणारं 'सरकार' जनतेच्या आवाजावर 'कानावर हात ठेवून' मोकळं झालंय. सर्व प्रश्न कोर्टानं सोडवण्यामुळे शासनाचं काम सोपं झालंय. जनहित याचिका आणि कोर्ट असा समाज चालतोय.

मात्र आवाजाच्या दुष्परिणांकडे दुर्लक्ष केल्यास पुढील पिढ्यांच्या आरोग्यावर परिणाम कसा होईल याबाबतचा त्र्यंबक दुनबळे यांचा एक लेख या अंकात प्रसिद्ध करत आहोत. तोही कोर्टानं दिलेल्या निर्देशांमुळे कायदेशीर उपाय सांगणारा. आपला प्रति'साद' अपेक्षित आहे.

**– संपादक**

# अचानक सापडलेला खजिना!

## सारंग दर्शने

खरं तर मी एक वेगळंच काम करणं अपेक्षित होतं. तेही लिखाणाचंच होतं. पण ते होत नव्हतं. मग 'राजहंस प्रकाशना'चे संचालक दिलीपराव माजगावकर मला म्हणाले, ते काम होत नसेल तर काही दिवस दुसरं एखादं काम करून पाहतोस का? त्यांनी मला विषय सांगितला.तो काही माझा हातखंडा विषय नव्हता, पण मी उत्साहानं हो म्हणालो. मग दिलीपरावांनी मला एक हस्तलिखित पाठवून दिलं. ते हस्तलिखित होतं, डॉ. चंद्रशेखर रेळे यांचं. हे डॉक्टर म्हणजे ज्यांना मुंबई विद्यापीठानं संगीतातली पहिली डी.लिट. बहाल केली होती. रेळे हे कायदेतज्ज्ञ होते. पण अन्य कुठल्या ओळखींपेक्षा त्यांची जबरदस्त ओळख म्हणजे ते आणि पंडित कुमारगंधर्व हे जानी दोस्त होते. लंगोटीयार म्हणावे इतके. दोघेही देवधरमास्तरांचे शिष्य. बी. आर. देवधर म्हणजे भारतीय शास्त्रीय संगीताच्या अध्यापनातील एक दंतकथाच. देवधरमास्तरांचं नाव मी ऐकलं होतं. ते कुमारांचे गुरू इतकंही मला आधी माहीत होतं. मात्र, चंद्रशेखर म्हणजे बाबुराव रेळे यांची आणि कुमारांची मैत्री मला माहीतच नव्हती. या हस्तलिखितामधून याच मैत्रीचा प्रवास बाबुरावांनी उलगडला होता. त्याला त्यांनी गोड नाव दिलं होतं, 'कुमार माझा सखा'! हस्तलिखित हातात पडताच मी ते अधाश्यासारखं वाचलं. तसं वाचण्यासारखंच होतं ते. तो एक खजिनाच होता. फक्त त्याची पुस्तकात असते तशी रीतसर मांडणी नव्हती केलेली. पानोपानी आठवणींची, संगीतविषयक ज्ञानाची, भारतीय शास्त्रीय संगीताच्या इतिहासाची, कुमारांवरच्या विलक्षण प्रेमाची रत्नं उधळलेली होती. ती पाहून मी खरंच दीपून गेलो. त्या रत्नांची मांडणी नीट केली तर त्यांचं तेज आणखी उजळून निघेल, असं मला वाटू लागलं. आपण हे काम करू शकू का, अशी शंका मनात वाटत असतानाच ते करण्याची तयारी दाखवून मी मोकळा झालो. बाबुरावांचे शिष्य भूपाल पणशीकर आणि दिलीपराव माजगावकर यांना या हस्तलिखितातून एक चांगलं पुस्तक जन्माला घालायचं होतं. माझ्यावर विश्वास टाकण्याची त्यांची तयारी होती. आता खरी कसोटी माझीच होती.



कुमारगंधर्व आणि बाबुराव

मग दिलीपराव माजगावकर आणि मी एका पावसाळी दुपारी ऑपेरा हाऊसच्या रेळे बिल्डिंगमध्ये शिरलो. तेव्हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्ती संपादन केलेल्या थोरामोठ्यांच्या पाऊलखुणा उमटलेला तो परिसर मनात भरत होता. त्यांच्या कर्तृत्वाचा काळ ओलांडून येणारा सुगंध सुखावत होता. रेळे हाऊसचा जिना चढताना पुढचे काही महिने आपण मंतरलेल्या दिवसांच्या आनंदयात्रेत न्हाऊन निघणार आहोत, याची मला तितकीशी कल्पना नव्हती. डॉ. चंद्रशेखर रेळे वाटच पाहत होते. तेव्हाच त्यांची वयाची आठ दशके ओलांडलेली. गोऱ्यापान चेहऱ्यावरचा तजेला मात्र तरुणासारखा. हसतमुखानं बोलण्याची लकब. बोलतानाचा आवाजही कमालीचा गोड. रेळे कुमारांपेक्षा तीन-चार वर्षांनीच लहान. देवधरमास्तरांसमोर एका बाकावर बसून गाणं शिकता शिकता त्यांची जी दोस्ती जमली ती पुढे कुमार १९९२ मध्ये अंतर्धान पावेपर्यंत टिकली. त्यानंतरही या मैत्रीचा सारस्वत प्रवाह वाहतच राहिला. तो अगदी अलीकडे चार महिन्यांपूर्वी बाबुरावांचे अचानक निधन होईपर्यंत. कुमार गेल्यानंतर स्वतःच्या शेवटच्या क्षणापर्यंत बाबुरावांचा कुमारांची आठवण निघाली नाही, असा एकही दिवस गेला नसेल.

या सगळ्या आठवणी शक्य तशा



**चंद्रशेखर रेळे**

बाबुरावांनी कागदावर उतरवल्या होत्या. त्यांच्या रीतीनं त्यांना क्रम दिला होता. त्यांची प्रकरणंही केली होती. यात व्यक्तिगत आठवणी होत्या, तशाच कुमारांच्या गाण्याची खुबी व मर्मस्थानं सांगणारी स्मरणंही होती. याशिवाय, शास्त्रीय संगीतातल्या दोन-तीन पिढ्यांमधील दिग्गजांची शब्दचित्रं होती. त्यांनी न लिहिलेल्या काही आठवणी असतील तर मी लिहून घ्याव्यात, त्या अनुषंगानं त्यांना काही प्रश्न विचारून त्यांची उत्तरंही पुस्तकात समाविष्ट करावीत, असं ठरलं. मी त्यानंतर बाबुरावांच्या घरी जाऊ लागलो.

कुमारांच्या आठवणी सांगताना बाबुराव अतिशय प्रसन्न असत. सहा दशकांहून अधिक काळ लोटलेले अनेक प्रसंग त्यांच्या तोंडून ऐकताना विस्मय वाटत राही. त्यांना सारे तपशील, घटना काल घडल्यासारख्या आठवत. एखाद्या प्रसंगी कोणकोण हजर होते, कोण काय म्हणाले, कोणाची प्रतिक्रिया काय होती हे सगळं बाबुराव इतके तपशिलात सांगत की अचंबाच वाटत राही. या काही नुसत्या गप्पांच्या आठवणी नसत, त्यात पुष्कळदा संगीत हाच केंद्रबिंदू असे. त्यातून संगीताच्या विशाल प्रवाहाचे कितीतरी तपशील समजत. त्यांना संगीताच्या इतिहासात महत्त्व असायचं. उदाहरणच द्यायचं झालं तर, कुमारांनी 'गौडमल्हार दर्शन' हा साडेतीन तासांचा कार्यक्रम केला होता. दहा-बारा बंदिशी केवळ याच रागाच्या. त्यातून या रागाचं सर्वांगदर्शन कुमारांनी घडवलं. पण एका छोट्याशा वादातून कुमारांची ईर्ष्या जागृत झाली होती. त्यातूनच या कार्यक्रमाचा जन्म झाला होता. हा घटनाक्रम बाबुरावांनी इतका तपशीलवार सांगितला, की एखाद्या नवनिर्मितीच्या मागे किती प्रेरणा, भावभावना काम करतात, हे समजावं. ही गौडमल्हारची कथा मला बाबुरावांनी फार रंगवून, अनेकदा सांगितली. बाबुराव सांगत, ''पंडित पंढरीनाथ नागेशकर या विख्यात तबलानवाजांची साठी होती. तिथे कुमार गंधर्व गौडमल्हार गायले. कुमारांनी बरसे मेहरवा ही भातखंड्यांच्या पुस्तकातली काहीशी अपरिचित बंदीश गायली. ती रसिकांनाच काय, बहुतेक कलावंतांनाही माहीत नव्हती. कुमार आपलं गाणं संपवून जेवायला मित्राच्या घरी आला. कार्यक्रम पुढे चालूच होता. तितक्यात एका मित्रानं बातमी आणली की, कुमारनंतर व्हायोलिनवादक गजाननराव जोशी व्यासपीठावर बसले आणि त्यांनी आता मी तुम्हाला खरा गौडमल्हार दाखवतो, असं सांगून कुमारला अप्रत्यक्ष फटकारलं. काही दिवसांनी पंडित सी. आर. व्यास यांनीही कुमारनं गायलेला काय गौडमल्हार होता का? अशी टीका केली. त्यानंतर कुमार एकदा मुंबईत माझ्या घरी आला तेव्हा त्यानं फोनवर व्यासांना एकाच मैफलीत आपण दोघांनीही गौडमल्हार गावा, असं सुचवलं. ती मैफल झालीच नाही. पण कुमारच्या डोक्यात तो गौडमल्हार जाऊनच बसला होता. त्यातूनच गौडमल्हारदर्शन हा कार्यक्रम जन्माला आला. त्यात दहा-बारा बंदिशी होत्या. या रागाचं चहुबाजूंनी समग्र दर्शन या बंदिशींमधून घडत होतं. हा कार्यक्रम पहिल्यांदा सादर झाला तेव्हा कुमार स्टेजवरूनच लटक्या रागानं मला म्हणाला, 'बाबू, हे सगळं तुझ्यामुळे होतं आहे.' त्यावर मी खालूनच म्हणालो, 'मग चांगलंच आहे ना!' बाबुराव ही व अशा आठवणी सांगताना फार रंगून जायचे. त्यांचा आनंद घेताना मीही रमून जायचो. भारतीय संगीताचा इतिहास असा साक्षात् आपल्यापुढे उलगडतो आहे, याचं एक भारावलेपणही मला यायचं.

बाबुरावांनी आपल्या मूळ हस्तलिखितात एक आठवण लिहिली नव्हती. ती पुस्तकात घालावी की नाही, याबद्दल त्यांचा काही निर्णयही होत नव्हता. किंबहुना, त्यांनी ती पुस्तकात घालायची नाही, याच हेतूनं मुळात लिहिली होती. आमच्या संवादाचे सूर जुळल्यानंतर आणि त्यांना माझ्याबद्दल थोडा विश्वास वाटू लागल्यानंतर एक दिवस बाबुराव मला म्हणाले, ''आज मी एक आठवण तुम्हाला सांगणार आहे. ती पुस्तकात घ्यावी की नाही, याचा तुम्हीच मला सल्ला द्या.'' कुमार आणि बाबुराव यांचं छोटंसं भांडण, त्यातलं पेल्यातलं वादळ आणि त्यानंतरचा काही काळाचा अबोला हा सारा घटनाक्रम मला मग सांगितला. समोरच बाबुरावांच्या

पत्नी पमाताई बसल्या होत्या. त्याही त्या घटनेच्या साक्षी होत्या. त्यांचे डोळे मधूनच पाणावत होते. बाबुरावांनाही वेदना लपवाव्या लागत होत्या. तरी आवाजात कातरता न आणता त्यांनी तो सगळा प्रसंग मला सांगितला. इतकंच नाही, तर मी ज्या शंका विचारल्या त्यांचीही त्यांनी मनापासून, सविस्तर उत्तरं दिली. हे भांडण केवळ व्यक्तिगत मानापमानाचं नव्हतं. त्यात संगीतातली गुरुपरंपरा, तिची प्रतिष्ठा आणि काही प्रमाणात दोघांचेही गुरू देवधरमास्तर यांच्या कर्तबगारीची ऐतिहासिकता हे मुद्देही गुंफले गेले होते. बाबुरावांच्या व्यक्तिमत्त्वामधली निर्भीड सत्यप्रियता, त्यांचं मित्रावरचं अकृत्रिम प्रेम आणि मैत्री राखण्यासाठी कसोटीच्या क्षणी तत्त्वांना मुरड न घालता चार पावलं मागे येण्याची मानसिक उदारता हेही त्यातून प्रतिबिंबित होत होतं. ही आठवण व हा सारा प्रसंगच पुस्तकात यायला हवा, असा आग्रह मी धरला. दिलीपरावांनाही तो पटला. एक तर सगळी मोठी माणसं ही शेवटी हाडामांसाची माणसंच असतात. त्यांनाही षडरिपुंचा विळखा पडू शकतो. अलौकिक प्रतिभा आणि मातीचं माणूसपण यांच्या घुसळणीमधूनच त्यांचं समाजमनावर गारूड करणारं रूप साकारत असतं. दिग्गजांचं असं मानुष रूप समजलं नाही की एकीकडे दंभ आणि दुसरीकडे त्यांना दिलं जाणारं भाबडं देवपण अशी दुहेरी कात्री समाजाचं नुकसान करते. म्हणूनच हा प्रसंग पुस्तकात जरूर यावा हा माझा आग्रह मी बाबुरावांना स्पष्टपणे सांगितला. त्यांनी तो मानला. इतकंच नाही, तर पुस्तकात तू हे सारं कसं लिहिणार आहेस, जरा टोन डाऊन करशील का? अशा सूचनाही केल्या नाहीत.

मला खरं तर बाबुराव एकटेच भेटत असत. परंतु, मला पुष्कळदा कुमारही भेटल्याचा आनंद होई. ही या दोघांच्या मैत्रीची किमया होती. त्यांचा काळ आणि आपला काळ अशी तुलना सतत माझ्या मनाच्या मागे चालत असे. त्या काळातल्या मैत्रीची अभंगता, व्यवहाराच्या विळख्यातून वाचणारी बरीच नाती, परस्परसंबंधांमधली मूल्यांची किमान राखण हे सारं आज आपण गमावून बसलो आहोत की काय, अशी व्याकुळता येई. यात निव्वळ स्मृतिकातरता नव्हती तर मूल्यव्यवस्था बदलून टाकणाऱ्या आधुनिक काळाचा मनावरचा दट्ट्याही होता.त्यामुळेच, बाबुरावांच्या बोलण्यातून केवळ कुमारच उलगडले नाहीत, स्वतः बाबुरावही उलगडत गेले. त्यांचे अनेक मित्र समजले. हे स्नेहाचं विश्व खरंच भुरळ पाडणारं होतं.

कुमार मोठ्या आजारातून बरे झाल्यावर देशभर मैफली करायला लागले. त्या काळात बाबुरावांनी एकदा कुमारांना 'मला तुझ्याबरोबर दौरा करायचाय', असं सांगितलं. कुमारांनाही आनंद झाला. या दौऱ्याची हकीकत फार सुरेख आहे. त्यातही बाबुराव आणि पमाताई या दांपत्याला कुमारांविषयी वाटणारा स्नेह जागोजागी दिसतो. मात्र, कुमारांचं गायक म्हणून सत्त्व काय दर्जाचं होतं याची एक आठवण मला आवडली. दिल्लीत एका सभागृहात कुमारांचं गाणं होतं. कुमार गायला बसले आणि काही क्षणांतच पंतप्रधान इंदिरा गांधी आणि त्यांचे चिरंजीव संजय सभागृहात आले. पहिल्या रांगेत बसले. कुमारांनी हात जोडले आणि गाणं सुरू केलं. संजयनं इकडे हातातला टेपरेकॉर्डर चालू करून कुमारांचं गाणे टिपायला सुरुवात केली. गाण्यात त्याचा अडथळा येताच कुमारांनी गाणं थांबवून, कुणाचंही नाव न घेता हे ताबडतोब थांबवा, अशी समज दिली. त्यावर इंदिराजींनीही ते बंद कर, असं संजयला सांगितलं. गाण्याची मैफल सुरू झाली की मी इथला राजा आहे आणि इथे केवळ माझाच सूर आणि शब्दही चालेल, हे कुमारांनी तेव्हा विनम्रपणे देशातल्या सर्वोच्च सत्ताधीशांना दाखवून दिलं. कदाचित, त्यांना तसं दाखवायचं नसेलही. घटना म्हणूनही ती छोटीशी आहे. पण कलाकार म्हणून त्यांचा जो मनस्वीपणा, अधिकार होता, त्याला सर्वोच्च सत्तेचंही काही कुंपण पडू शकलं नाही, हे महत्त्वाचं.

हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर बाबुरावांना फार आनंद झाला. 'आता मला आत्मचरित्र लिहिण्याची गरज उरलेली नाही' असं ते जवळच्या शिष्यांजवळ बोलून दाखवू लागले. 'कुमार माझा सखा' हे पुस्तक आवडल्याचं त्यांना अनेकांनी सांगितलं. ते ऐकून त्यांचा हुरूप वाढत असे. मला ते म्हणत, आपण संगीतातल्या घराण्यांविषयी असेच पुस्तक करु या का? बाबुरावांनी भारतीय संगीतातल्या काही थोर पुरुषांची व्यक्तिचित्रं लिहून ठेवली होती. तसंच, संगीताचा प्रवास आणि घराण्यांचा जन्म यावरही काही लिखाण केलं होतं. ही पुस्तकंही चांगली होतील याची त्यांना खात्री वाटत होती. ती खात्री योग्यच होती. पण 'कुमार माझा सखा' प्रकाशित झाल्यानंतर एकदा मला बाबुराव एकदम कृश झाल्यासारखे, थकल्यासारखे वाटले. बोलण्यात उत्साह होता, पण शरीरावरची कांती व चेहऱ्यावरचं तेज काहीसं उणावलं होतं. माझं मन चरकलं. वाटलं, हे पुस्तक आल्यावर सारं सुफळ संपूर्ण झाल्यासारखं तर त्यांना वाटत नसेल ना? या साफल्य-भावनेतून बाबुरावांच्या जीजिविषेला ओहोटी न लागो, अशी मी मनोमन प्रार्थना केली. पण पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आणि काही दिवसांतच बाबुरावांनी गाता गाता, शिष्यांसमोर कुमारांच्या गाण्याचं मर्म उलगडता उलगडताच निरोप घेतला... बाबुरावांच्या मनात जन्मभर साठत आलेला खजिना त्यांनी रसिकांसमोर खुला केला होता. त्यानंतर आता दिस चार खेळीमेळी, अशा अवस्थेत ते असावेत.. कुमार गंधर्व आणि बाबुराव रेळे यांच्या मैत्रीचा सारस्वतप्रवाह रसिकांसमोर येण्यात आपला थोडासा हातभार लागला, याचं मला फार समाधान वाटतं...

**सारंग दर्शने**
sarang.darshane@gmail.com

# वाद्यचुडामणी वसंत सामंत


## अरुण पुराणिक

आज यशोमंदिराच्या कळसावर बसलेले गायक, गायिका, संगीतकार यांच्याकडे कौतुकाने पाहिले जाते. त्यांना अनेक सांगीतिक कार्यक्रमांसाठी आवर्जून बोलावले जाते. पुरस्कार दिले जातात. परंतु फिल्मीगीतांच्या सौंदर्यप्रसाधकांना, गुणी वादक-कलाकारांना मात्र का कोण जाणे विसरले जाते. गाणे नटवण्यात-खुलविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असतो. आजही जुनी अवीट गोडीची गाणी ऐकत असताना पडद्यामागील या अनामिक कलाकारांचे अस्तित्व सारखे जाणवत राहते. गाण्यांना लाभलेल्या त्यांच्या परिसस्पर्शाविषयी कुतूहल निर्माण होऊन त्या वादक-कलाकारांना प्रत्यक्ष भेटून दाद देण्याची ऊर्मी दाटून येते.

मुंबईत १९४३ मध्ये नव्याने स्थापन झालेल्या, शांताराम बापूंच्या राजकमल कलामंदिरमध्ये पहिल्या दिवसापासून संगीतकार वसंत देसाईंचे प्रमुख साहाय्यक, वादक कलाकार म्हणून कार्यरत असलेले वसंत मुकुंद सामंत यांना त्यांच्या घरी भेटण्याचा योग नुकताच आला.

विस्मृतीत गेलेल्या त्या कलाकृती, ते संगीत त्यांच्याशी बोलताना त्यांनी जागव-लेल्या, पडद्यावरील प्रसंग व कलाकारांच्या आठवणी, सामंतांच्याच शब्दात :-

आम्ही मूळचे गोव्याचे! पाच भावंडांत मी सर्वांत मोठा. वडील शिक्षक, घरची परिस्थिती बेताची. अर्थार्जनासाठी मी मुंबईला आलो. गिरगावात कुडाळदेशकर वाडीत माझे वास्तव्य होते. संगीतकार अण्णासाहेब माईणकर यांच्या ओळखीने, १९३९ मध्ये, वयाच्या बाविसाव्या वर्षी अत्रे पिक्चर्समध्ये मला जलतरंगवादक म्हणून



वसंत सामंत

नोकरी मिळाली. त्यावेळचा एक प्रसंग आजही माझ्या स्मरणात आहे. 'पायाची दासी' (१९४०) या चित्रपटात नायिका वनमाला गाणे गाते. त्यावेळी तिला साथीला तानपुऱ्याचा सूर मिळावा, परंतु चित्रिकरणाच्या वेळेस प्रत्यक्ष तानपुरा दिसू नये म्हणून तिथल्या विद्वान पारशी रेकॉर्डिस्टने मला चक्क कारदार स्टुडिओतील सेटवरच्या विहिरीत बसवून वाजवायला सांगितले आणि मी तिथे बसून तो तानपुरा सुरात वाजवला! आजही ते आठवले की हसू येते.

त्यानंतर मी वाडिया मुव्हिटोन संस्थेत चार चित्रपटांचे काम केले. १९४३ पासून राजकमलमध्ये संगीतकार वसंत देसाई यांचा साहाय्यक म्हणून काम सुरू केले. व्ही. शांताराम यांनी संगीत विभागात अनेक देशीविदेशी संगीतवाद्ये आणून ठेवली होती. गरजेप्रमाणे ते ते वाद्य वाजवणाऱ्या बाहेरच्या कलाकाराला रेकॉर्डिंगसाठी बोलावले जात असे. जेव्हा संगीत विभागात कलाकारांना काम नसे तेव्हा ते गप्पा मारत, पत्ते खेळत टाइमपास करत. अशा वेळी मी तिथली वेगवेगळी वाद्ये वाजवण्याचा सराव करत असे. व्हायब्रोफोन, पियानो, घडा, काष्ठतरंग, बर्मीजतरंग, व्हायोलिन, मेण्डोलिन अशा अनेक वाद्यांवर मी सराव केला. उपजत संगीताची जाण, इतर वादक-कलाकारांचे सूक्ष्म निरीक्षण, मेहनत या बळावर मी अनेक वाद्ये वाजवण्यात निपुण झालो. त्यामुळे वसंत देसाईंनी स्वरबद्ध केलेल्या प्रत्येक गाण्यात मी कोणते ना कोणते वाद्य वाजवत असे. त्याची काही प्रसिद्ध उदाहरणे सांगतो.

'रम्य ही स्वर्गाहुनी लंका' - (स्वयंवर झाले सीतेचे) - जलतरंग

'छडी लागे छम छम'- श्यामची आई (या गाण्याच्या सुरवातीला मोरचंग हे लोकसंगीतातील पारंपरिक वाद्य वाजवले आहे.)

'मेरी आन भगवान' - तुफान और दीया (डुग्गीतरंग)

'तेरे सूर और मेरे गीत' - गुंज उठी शहनाई (चायनीज ब्लॉक्स)

'नैंन सो नैंन नाही मिलाओ' - झनक झनक पायक बाजे

'टीम टीम तारों के दीप जले' - मौसी (व्हायब्रोफोन)

'देव जरी मज कधी भेटला' - मोलकरीण (व्हायोलिन).

'दो आँखे बारह हाथ' चित्रपटात लताच्या 'मैं गाऊँ तू चूप हो जा' या लोरीत त्या प्रसंगाला वास्तवाचा स्पर्श देण्यासाठी, खिडकीची कडी वाऱ्याने आपटल्याचा आवाज गाण्यातील समेसाठी घेण्याची सूचना

शांतारामबापूंनी केली. पाईपतरंगवर तो आवाज मी हुबेहुब काढला आहे. याच गाण्यात भूर्जीखां यांनी फार सुरेख चायनीज ब्लॉक्स वाजवले आहेत.

वसंत देसाईंकडे त्या काळात अनेक गुणी वादक-कलाकार होते. त्यापैकी अनेक आजही आठवतात.

'लटपट लटपट तुझं चालणं' - अमर भूपाळी (ढोलकी -लाला गंगावणे),

'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला' - अमर भूपाळी (तबला -तौफेल),

'सैय्या झूठों का बडा सरताज निकला' - दो आँखे बारह हाथ (कोका- गजानन कर्नाड),

'तांडवनृत्य ब्रहमताल' - झनक झनक पायल बाजे. (या प्राचीन तालात २८ मात्रांचे एक आवर्तन असते. (पखवाज - रामदास)

मातीचा मोठा घडा वाजवण्यात माझ्या जोडीचा कुणी कलाकार त्या काळात फिल्मी गीतात नव्हता. सिने संगीतात मी जो घडा वाजवत असे तो मोठा घडा राम पंजवानी या गृहस्थाने पंजाब येथून आणून दिला होता. छोटे तोंड व भले मोठे पोट! डाव्या हाताच्या बोटात अंगठी घालून दोन्ही हातांनी पोटावर आघात केल्यावर निघणारा धीरगंभीर ध्वनी वातावरण भारून टाकत असे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'धनश्याम सुंदरा श्रीधरा' - ही अमर भूपाळी. या गाण्याच्या लोकप्रियतेमुळे मातीचा घडा म्हणजे वसंत सामंत हे समीकरण झाले. अनेक संगीतकारांकडे मी घडा वाजवला.

'दिल ने फिर याद किया' - महल

'तस्वीर बनाता हूं तस्वीर नही बनती' - बारादरी

'गुजरी थी रात आधी' - सुरंग

'अपनी ना कामी से मुझको' - सुबह का तारा

'रात जा रही है' - उद्धार

'मेरा प्यार तडपता है' - अमर ज्योती

संगीतकार रेकॉर्डिंगच्या दिवशी घडा नेण्यासाठी गाडी व ड्रायव्हर घरी पाठवत. एका गाण्याकरिता घडा वाजवण्यासाठी मला त्यावेळी रोख सव्वाशे रुपये मिळत असत. वाद्यवादनाच्या जोडीला, ऐकत असलेल्या प्रत्येक गाण्याचे भातखंडे पद्धतीने नोटेशन (स्वरलिपी) करण्यात मी प्राविण्य मिळवले.

वसंत देसाई हे देवभक्त आणि मेहनती संगीतकार होते. भल्या पहाटे देवदर्शनासाठी गाडी घेऊन आम्ही नाशिकहून त्र्यंबकेश्वरला जात होतो. त्या सकाळच्या प्रसन्न वातावरणात त्यांना 'घनश्याम सुंदरा'ची चाल सुचली. ते ही चाल गुणगुणत असताना ताबडतोब कागदावर स्वरलिपीमध्ये मी ती उतरवून घेतली. त्या काळी टेपरेकॉर्डरसारखी यंत्रे उपलब्ध नसल्याने नोटेशन करण्याला फार महत्त्व होते. वसंत देसाई प्रवासात बाहेरचे पाणी पीत नसत. त्याऐवजी सोड्याच्या बाटल्यांचा क्रेट ते कारमध्ये ठेवत असत. कधी लोकांचा त्यामुळे गैरसमज होई, की दारूबरोबर घेण्यासाठी हे आपल्याजवळ सोडा बाळगत असावेत. परंतु वसंत देसाईंनी दारूला स्पर्शही कधी केला नाही.

धिं त्रक धिं धा। तिं त्रक तिं ता। केहरवाचा हा विशिष्ट ठेका वसंत देसाईंनी त्यांच्या अनेक गाण्यांतून लोकप्रिय केला :

'निर्बल से लडाई भगवान की' - तूफान और दीया

'पिया ते कहाँ गयो नेहरा लगाय' - तूफान और दीया

'ऐ मालिक तेरे बंदे हम'- दो आँखे बारह हाथ

'ऋणानुबंधाच्या इथून पडल्या गाठी' - देव दीनाघरी धावला.

वसंत देसाई यांच्या वाद्यवृंदात आठ ते दहा पगारी वादक कलाकार होते. तबला- मामूलाल (महंमद), सारंगी-जिरेखान, पखवाज-रामदास, छोटा सरोद- हरिपाद घोष, मोठा सरोद- झरीन दारूवाला, सतार- अब्दुल हलीम जाफर खान, पियानो- व्हीस्ताज बलसारा, हवाईयन गिटार- हजारा सिंग व हार्मोनियम - बाबुराव नेचकर. इतर वाद्ये कारदार स्टुडिओतून भाड्याने आणून वापरली जात.

राजकमलच्या 'तीन बत्ती चार रस्ता' चित्रपटाचा नायक करण दिवाण होता. संध्याने त्याच्या घरी काम करणारी सावळी मुलगी श्यामा साकारली होती. ही मुलगी गोड गळ्याची गायिका असते व कोकिळा या टोपण नावाने ती रेडिओवर गाण्याचे कार्यक्रम करते. करण दिवाण तिच्या आवाजावर लुब्ध होतो. परंतु करण दिवाणावर एकतर्फी प्रेम करणारी एक तरुणी कुणाकरवी तरी कोकिळेस चहातून विषारी रसायन पाजते. त्यामुळे कोकिळेचा आवाज जातो.

चित्रपटातील हा भाग शांताराम बापूंनी सत्य घटनेवरून घेतला आहे. व्यावसायिक मत्सरापोटी त्या सुमारास लतादीदींना कुणीतरी चहातून शेंदूर पाजला व त्यामुळे दीदी काही काळ गाऊ शकत नव्हत्या. त्या काळच्या स्क्रीन साप्ताहिकात संगीतकार सचिनदेव बर्मन यांच्या मुलाखतीत या घटनेविषयी लिहिलेले होते. पुढे त्यावरच्या औषधोपचारासाठी दीदी बर्लिनला जाऊन आल्याचेही त्यात म्हटले आहे.

'झनक झनक पायल बाजे'चे शीर्षक गीत हेमंत कुमार व लता यांच्या आवाजात रेकॉर्ड करण्याचे ठरवून, वसंत रागात त्या गीताची चाल बांधली गेली. वसंत रागात आरोहात, सामग, मधनिसा या टप्प्यावर पाठोपाठ दोन्ही मध्यम व कोमल धैवत लावताना हेमंतकुमार बेसूर होत असे. कारण हेमंतकुमारने शास्त्रीय संगीताची तालीम घेतली नव्हती. शेवटी महत्प्रयासाने ते युगलगीत रेकॉर्ड झाले. परंतु ते शीषर्क- गीताच्या योग्यतेचे वाटत नव्हते. म्हणून मग अडाणा रागात चाल बांधून ते आमीर खांकडून गाऊन घेतले. चित्रपटाच्या अखेरीस वसंत रागातील हेमंत-लता यांच्या आवाजातील ते गीत ऐकू येते. 'झनक झनक पायल बाजे'ची चाल दरबारी कानडा रागातही बांधली होती. चित्रपटात गोपीकृष्ण (गिरीधर) ही चाल गुणगुणताना दिसतो.

'राजकमल'मध्ये चित्रपटातील गाण्यात साजिंदे (वादक कलाकार) दाखवायचे असतील तर प्रत्यक्ष वादकांनाच पोशाख चढवून सेटवर बसवले जाई. 'झनक

झनक पायल बाजे' चित्रपटातील 'कैसी यह मोहब्बत की सजा' गाण्याचे चित्रण चालू होते. या गाण्यात मी डुग्गीतरंग वाजवला आहे. गोपीकृष्ण आपली नृत्याची झलक दाखवताना बेभान होऊन आता वादकांच्या अंगावर पडणार या भीतीने मी माझ्या वाद्यासह पटकन पाठी सरकलो. हा वास्तववादी शॉट व्ही. शांताराम यांना आवडल्याने त्यांनी रिटेक न घेता तो प्रसंग चित्रपटातही तसाच ठेवला आहे. पर्बत पे अपना डेरा, तीन बत्ती-चार रस्ता, झनक झनक पायल बाजे यासारख्या अनेक चित्रपटांतून शांतारामबापूंनी मला वादक-कलाकाराची भूमिका दिली आहे.

राजकमल कलामंदिरचा 'झनक झनक पायल बाजे'१९५५ साली चित्रपट प्रदर्शित झाला. त्याचे सर्वत्र भरघोस स्वागत झाले. चित्रपटाच्या प्रचंड यशाला केवळ आपली अदाकारी व नृत्य कारणीभूत आहे असा सूर अभिनेत्री संध्या हिने लावला. तेव्हा संगीतकार वसंत देसाईंना उघडपणे सांगणे भाग पडले की 'झनक झनक पायल बाजे' यशस्वी होण्यामागे केवळ संध्याचा नृत्याभिनय नाही तर गोपीकृष्ण यांचे उत्तम नृत्य आणि वसंत देसाई यांच्या संगीताचा सिंहाचा वाटा आहे. या घटनेने वसंत देसाई मनोमन दुखावले. आधीपासूनच त्यांना बाहेरची अनेक बोलवणीही येत होती. शेवटी, १९५८ मध्ये वसंत देसाईंनी 'राजकमल'च्या नोकरीचा राजीनामा दिला व ते बाहेरची कामे करू लागले. त्यांच्या-बरोबर मी ही राजकमलमधून बाहेर पडलो.

मी देसाईंबरोबर विविध चित्रपटांसाठी १९७२ पर्यंत काम केले. त्यानंतर वसंत देसाई यांना हळूहळू नवीन कामे मिळणे कमी होत गेले. काळाची पावले ओळखून, हताश न होता मी घरी व बाहेर जाऊन संगीत शिकवण्या सुरू केल्या. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. वयाच्या साधारण ऐंशीव्या वर्षापर्यंत संगीत शिकवण्या केल्या, अनेकांना संगीत शिक्षण दिले.

वाद्यवादनाबरोबरच मी सुतारकाम, रंगकाम व शिवणकामातही निपुण आहे. गेली साठ वर्षे मी गोरेगाव पूर्वेस पांडुरंग वाडीत वसंतलता या स्वत:च्या घरात राहतो. मला तीन अपत्ये. त्या सर्वांनी माझा संगीताचा वारसा घेतला. पत्नी स्नेहलता व मोठा मुलगा अनिलकुमार यांचे निधन झाले. अनिल तबला व व्हायोलिन उत्तम वाजवत असे. धाकटा भूषण हार्मोनियम, संतूर, पट्टीतरंग वाजवतो व घरी संगीतशिकवण्या करतो. लेक नीलिमा लग्नापूर्वी गायनाचे स्वतंत्र कार्यक्रम करत असे.

हृषिकेश मुकर्जीचा 'गुड्डी' हा लो बजेट चित्रपट होता. त्यातील मुख्य गाणी 'बोल रे पपीहरा' व 'हम को मन की शक्ति देना!' मिया मल्हार रागातील चीज 'बोल रे पपीहरा' थोडासा बदल करून वसंत देसाईंनी तिचे सुंदर सिनेगीत बनवले. या दोन्ही गाण्यांसाठी माझी कन्या नीलिमा हिची निवड वसंत देसाईंनी केली. रिहर्सल झाल्या, रेकॉर्डिंगचा दिवसही ठरला. याच सुमारास वसंत देसाई यांचे संगीतातील गुरू इनायत खां यांनी त्यांची एक शिष्या वाणी जयराम हिला चित्रपटात पार्श्वगायनाची संधी देण्याविषयी वसंत देसाईंना आग्रह केला आणि रेकॉर्डिंगच्या दिवशी स्टुडिओत वाणी जयरामला हजर केले. गुरूंच्या आग्रहास्तव वसंत देसाईंनी दोन्ही गाणी वाणी जयरामकडून गाऊन घेतली व नीलिमाला 'हम को मन की शक्ती देना'मध्ये कोरस गायला सांगितले. तिच्या हाती आलेली संधी गेली. असो.''

सामंतांनी तो काळ समोर उभा केला. त्यातून उभी राहिली कलासाधना, निष्ठा आणि निस्पृहता. प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा स्वभाव. इतकी वर्षे फिल्मी दुनियेत असूनही कसलेही व्यसन नाही की पार्ट्या नाहीत. गेली सत्तर वर्षे एखाद्या योग्यासारखी त्यांनी फक्त संगीतसाधना केली. त्यामुळेच कदाचित त्यांची प्रकृती अजूनही ठणठणीत राहिली आहे. येत्या १५ ऑगस्टला फिल्मी संगीताच्या सुवर्ण काळातील हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि साथीदार ९४ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. त्यांना रसिकांचा मानाचा मुजरा!

**अरुण पुराणिक**
vgpuranik@gmail.com

## अभिनंदन



**पद्मभूषण देशपांडे**

'ग्रंथाली'चे सुरुवातीपासूनचे सक्रिय कार्यकर्ते व विश्वस्त पद्मभूषण देशपांडे गेली अनेक वर्षे सजग पत्रकार म्हणून विविध वृत्तपत्रांतून काम करत आहेत. त्यात त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.
नुकतीच त्यांची दैनिक 'सकाळ', मुंबई आवृत्तीचे कार्यकारी संपादक म्हणून नियुक्ती झाली. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करताना ग्रंथाली परिवारास आनंद होत आहे. तरुण वयात, योग्य वेळी त्यांना हा सन्मान लाभल्याचे समाधान वाटते. त्यांना भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**- संपादक**

# वाहतूकप्रणाली आणि पादचारी

## विनायक गोखले

ज्येष्ठ पत्रकार विद्याधर दाते यांनी 'वाहतूक प्रणाली आणि पादचारी' या विषयावर लिहिलेल्या ३६६ पानी पुस्तकाचा आवाका विलक्षण व्यापक आहे. खाजगी वाहने आणि भांडवलशाही यांच्या अतूट संबंधांवर झोत टाकून, सार्वजनिक परिवहनाला कसे अधिकाधिक महत्त्व दिले पाहिजे याबद्दलचे विवेचन या इंग्रजी भाषेतील ग्रंथात आहे. रस्ते, वाहने आणि पादचारी असा विषय हाताळणारे एकही पुस्तक मराठीत नाही. त्यामुळे दाते यांच्या पुस्तकाचे लवकरात लवकर मराठीकरण होणे अगत्याचे आहे.

पादचाऱ्यांवर सर्वत्र होणारा अन्याय आणि सामाजिक विषमता यांची सांगड घालतानाच हुकूमशाही, भांडवलशाही आणि वाहन उद्योग यांचा परस्परसंबंधही दाते यांनी स्पष्ट करून दाखवला आहे. या अन्यायाला आपण एवढे सरावलो आहोत, की आपल्याला तो जाणवतही नाही. आता तर वामपंथीयांनाही असे वाटू लागले आहे की रस्त्यांवरील वाहनांची संख्या पाहता ही वस्तुस्थिती स्वीकारलीच पाहिजे. ही बाब अत्यंत खेदाची आहे. मुद्दा असा आहे की रस्त्यांचा वापर करताना प्रथम प्राधान्य सामान्य माणसाला दिले पाहिजे. त्यानंतर वाहनांचा क्रम लागला पाहिजे.

उपासमार, कुपोषण, झोपड्या असे विषय आपल्या दैनंदिन चर्चेचे नसतात असे ढोबळमानाने म्हणता येईल. त्यातही रस्त्यांवरील विषमता फारच टोचणारी असते. याकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. आतापर्यंत दुर्दैवाने ते घडलेले नाही. दाते यांच्या पुस्तकात अशा विविध विषयांचा मागोवा घेतलेला आहे. 'भारतीय परिवहन प्रणालीमधील अन्याय' हा पुस्तकाचा केंद्रबिंदू आहे. वाहन व्यवसायाचा प्रभाव असणारे परिवहनविषयक नियोजन आणि नगरविकास याबाबतच्या धोरणालाच या पुस्तकात आव्हान देण्यात आलेले आहे.



**विद्याधर दाते**

त्याचे शीर्षक आहे, ''चालणे, सायकलिंग, सार्वजनिक वाहतूकप्रणाली – हवामान बदलाच्या युगात वाहतूक.'' मोटारगाडीचे लाड आणि उदात्तीकरण यांचीही चर्चा करण्यात आली आहे. मोटारगाडीचे राजकारण, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र तसेच एकंदरीत वाहतूक क्षेत्रावर दृष्टिक्षेप, वेगाचे वेड, रस्त्यांवरील लोकशाहीचा पूर्ण अभाव, मोटारगाडीमुळे सर्वसामान्यांसाठी असणाऱ्या जागा व्यापल्या जाणे असे नानाविध मुद्देही त्यात चर्चिले आहेत.

आपल्या मनोगतात दाते म्हणतात, ''हा विषय मी निवडण्याचे कारण म्हणजे अन्याय, आर्थिक आणि सामाजिक असमानता यांचे सर्वाधिक ठळक दर्शन रस्त्यांवरच होते.''


उद्योगपती जे.आर.डी. टाटा आपल्या गाडीत रस्त्यावरील लोकांना आपणहून 'लिफ्ट' देत असत. मिठापूर येथील कारखान्याच्या आवारात, त्याचे प्रमुख दरबारी सेठ सायकलवरून फिरत. टाटा समूहाचे आणखी एक संचालक एस.ए. सबावाला पादचाऱ्यांना अधिक सुविधा मिळाव्या असे प्रतिपादन करत. जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ अमर्त्य सेन आरंभी शांतिनिकेतन आणि इतरत्र सायकलवरूनच फिरत असत. आता मात्र मोटारींची उद्धट संस्कृती निर्माण झाली आहे.

संस्कृती आणि विकास या प्रक्रियांचा दाते प्रदीर्घ काळपर्यंत अभ्यास करत आले आहेत. ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस आणि तत्कालीन विचारवंतांबरोबरच अलीकडचे शेक्सपीअर, चार्ल्स डिकन्स आणि आर्थर मिलर यांच्यापर्यंत विविध लेखकांचे दाखले पुस्तकात जागोजागी सापडतात. गोदार्दच्या 'वीकएन्ड ऑफ १९६७' या चित्रपटात मोटारींची एक टक्कर दाखवण्यात आली आहे. प्रतारणा आणि हिंसा यांचा वापर या दृश्याच्या माध्यमातून करताना गोदार्दने मोटार आणि भांडवलशाही यांच्या दृढ संबंधांवर भेदक भाष्य केले आहे. अरविंद अडिगा यांच्या 'व्हाईट टायगर' या कादंबरीत एका वाहनचालकाच्या नजरेतून भारतातील विषमता टिपण्यात आली असून मोटारचालक कसे वागतात याचे वर्णनही आहे.

दाते यांच्या पुस्तकाचे नायक आहेत महात्मा गांधी. त्यांच्या उद्गारांचा संदर्भ ठिकठिकाणी आढळतो. कारण चालण्याचे

ते कट्टर पुरस्कर्ते होते आणि परिवहनाबाबत त्यांचा दृष्टिकोन मानवतेचा होता. मोटारीकडे पाहण्याची दृष्टी आता हळुहळू बदलत आहे. सर्वाधिक मोटार वापर होत असलेल्या अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा आता सार्वजनिक वाहतूक प्रणालीचा पुरस्कार करू लागले असल्याचे पुस्तकात म्हटले आहे. मात्र भारतीय अधिकारीवर्ग जगातील आदर्श उदाहरणांकडे दुर्लक्ष करून वाईटातील वाईट पर्याय निवडत असल्याची टीकाही या पुस्तकात आहे. 'नासा'तर्फे नुकत्याच करण्यात आलेल्या एका पाहणीनुसार, जगातील सर्वाधिक प्रदूषण मोटार वाहनांमुळे होत आहे. अमेरिकेचे वाहतूकमंत्री रे लाहूड यांनी पादचाऱ्यांना आणि सायकलस्वारांना नियोजन प्रक्रियेत समान महत्त्व देण्याचे आवाहन केले आहे. अमेरिकन धोरणामधील हा बदल लक्षणीय आहे. यावरून तरी भारतीय अधिकाऱ्यांनी बोध घ्यावा, किमान पर्यावरणरक्षणासाठी तरी.

या पुस्तकाच्या विषयाबद्दल नगररचनाकारांपासून कार्यकर्त्यांपर्यंत आणि अभ्यासकांपासून स्वयंसेवी संस्थांपर्यंत सर्वांनाच आपलेपण वाटेल. इंधन तेलासाठी जगभर चालू असलेली साठमारी, त्यासाठी होणारे उत्खनन आणि तेलाचा होणारा पुरवठा या सर्वांना बांधणारा एक समान धागा आहे. त्यामुळे कमालीचे नुकसान होत आहे. समुद्राचे निळे पाणी काळे पडू लागले आहे, कारण तेलगळती आणि प्रदूषण. जगातील चौथ्या क्रमांकाची तेलकंपनी असणाऱ्या ब्रिटिश पेट्रोलियमचा राजकीय इतिहास सध्या कंपनी करत असलेल्या प्रदूषणासारखाच कुप्रसिद्ध आहे. इराणमधील लोकनिर्वाचित सरकार १९५३ साली उलथवण्यात या कंपनीचा हात होता. इराणी पंतप्रधान मोसाडेक यांनी संबंधित ब्रिटिश-इराणी कंपनीचे राष्ट्रीयीकरण केल्याबद्दलचा राग व्यक्त करण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला होता. तो यशस्वी झाला आणि इराणच्या शहाची या पदी नियुक्ती करण्यात आली. आज इराणच्या नावानेही पश्चिमी राष्ट्रांच्या अंगावर काटा उभा राहतो. ही परिस्थिती कोणी ओढवून घेतली? मोटारगाडी, तेल लॉबी आणि अमेरिकेतील उजव्या राजकीय शक्ती यासाठी जबाबदार आहेत.




मुंबईचा सहार आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात येत होता तेव्हा त्याच्या परिसरात भरपूर मोकळी जागा होती. या विमानतळास शहराच्या वाहतूक व्यवस्थेला थेट जोडणारा रस्ता किंवा रेल्वेमार्ग बांधणे तेव्हा शक्य होते. आपले राजकीय नेते आणि नियोजनकार यांना दूरदृष्टी असती तर हे तेव्हाच घडले असते. अशी सुविधा चेन्नईमध्ये उपलब्ध आहे, कोलंबोमध्येही आहे. कल्पनाशक्तीचा माफक वापर केला तरी मोटारी वापरण्याची गरज पुष्कळ कमी करता येऊ शकते. सहार विमानतळासाठी बांधण्यात आलेला भव्य वाहनतळ पाहिल्यावर हे विचार दाते यांच्या मनात आले. आता मेट्रो-मोनो रेल्वे झाल्यानंतर तरी तसे घडो अशीच प्रत्येक मुंबईकराची भावना राहणार आहे.

परिवहनाबरोबर संबंधित विविध मुद्यांचा परामर्श घेणारे भारतातील हे एकमेव पुस्तक आहे. दाते अत्यंत आत्मविश्वासपूर्वक तसा दावा करतात. परिवहन आणि वाहतूक यांच्याबाबतचा दृष्टिकोन मानवी असावा यासाठी पश्चिमी राष्ट्रांमध्ये मोठी जागृती निर्माण होत आहे. या दृष्टीने विचार करणाऱ्यांना भारतात या क्षेत्रात काय चालले आहे याबाबत जाणून घेण्याची उत्सुकता आहे. दाते म्हणतात, की आपल्याला भारतात तशी जागरुकता निर्माण करायची आहे; अधिकारी, नियोजनकार आणि राजकीय नेतृत्वाचे त्यासाठी प्रशिक्षण करायचे आहे. मुंबईत नव्याने बांधलेले बस थांबे पादचाऱ्यांसाठी अतिशय गैरसोयीचे आहेत. त्यामुळे आपले म्हणणे अधिक स्पष्ट होते, असे दाते यांना वाटते.

अमेरिकेत मोटार व्यवसायाची वाढ व्हावी म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार लॉबीतर्फे मोडीत काढण्यात आली. मुंबईतील ही व्यवस्था अधिकारीवर्गच मोडून टाकत आहे. त्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची आबाळ करण्यात येत आहे. आपले नेते मुंबईजवळ आणखी एक विमानतळ पाहिजे यासाठी हिरिरीने वाद घालतात. मात्र जागा उपलब्ध असूनही गेली अनेक वर्षे आंतरराज्य बस टर्मिनस मुंबईत बांधून होण्याच्या प्रतिक्षेत असल्याचा त्यांना सोयीस्कर विसर पडतो, असा आरोप दाते यांनी केला आहे.

मुंबईत 'टाइम्स ऑफ इंडिया'चे प्रतिनिधी म्हणून अनेक वर्षे काम केल्याचा अनुभव दाते यांच्या गाठीशी आहे. त्याचा प्रभाव पुस्तकभर जाणवेल. अत्यंत वेगळ्या विषयावरील या पुस्तकाचे वैचारिक वर्तुळाबरोबर सर्वसाधारण वाचकवर्गा-कडूनही स्वागत होईल एवढा त्याचा आवाका आहे.

**विनायक गोखले**

मो. नं. ९८६७३१४४८१

# ध्वनिप्रदूषण

## त्र्यंबक दुनबळे

आधुनिक जगापुढे तीन प्रमुख समस्या आहेत. लोकसंख्यावाढ, दारिद्र्य आणि प्रदूषण. या समस्यांनी मानवी अस्तित्वालाच आव्हान दिले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास कार्यक्रम अहवालानुसार (२०१०) भारतातील सुमारे एकतृतीयांश जनता दारिद्र्यरेषेखाली आहे. या लोकसंख्यावाढी-मुळे केवळ भारतातच नव्हे तर, जगात सर्वत्र पर्यावरणाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रदूषण ही त्यातील एक प्रमुख समस्या आहे. जल, वायू आणि आवाजाच्या प्रदूषणांनी मानवाला कर्करोगासारखे ग्रासले आहे, ज्यामध्ये मृत्यू निश्चित आहे, फक्त तो हळुवारपणे आक्रमण करत आहे. याबाबत नोबेल पारितोषिकाने सन्मानित जर्मन शास्त्रज्ञ रॉबर्ट कॉख (१९०५) यांनी एक शतकापूर्वी जगाला इशारा दिला होता. ते म्हणाले होते, एक दिवस असा येईल, की मानवाला आपल्या आरोग्याचा सर्वांत मोठा शत्रू म्हणून पटकी आणि प्लेग या रोगांप्रमाणेच ध्वनिप्रदूषणाशी लढावे लागेल. त्यांचे हे उद्‌गार आज खरे ठरले आहेत. पटकी आणि प्लेग या आरोग्याच्या महाभयंकर शत्रूंना नष्ट करण्यात यश आलेला मानव, आता प्रदूषणाच्या विविध समस्यांबरोबर प्राणपणाने झुंजत आहे. त्यामुळेच कदाचित लिसा गोईस (२००७) या तज्ज्ञाने ध्वनिप्रदूषणाला आधुनिक प्लेग असे संबोधले आहे.

गेल्या दोन दशकांपासून पर्यावरणा-विषयी जगभर चिंता व्यक्त होत आहे. सेव्ह दि अर्थ किंवा ग्लोबल वॉर्मिंग हे शब्द सारखे कानावर पडत आहेत. रिओ दी जानेरो येथे झालेल्या जागतिक पर्यावरण परिषदेनंतर (१९९२) पर्यावरण संरक्षण हा विषय आंतरराष्ट्रीय अजेंड्यावर प्राध्यान्याने आला आहे. वाढते औद्योगिकीकरण, बेहिशोबी जंगलतोड, वाढती लोकसंख्या, नागरीकरणाचा भयानक वेग आणि खनिज तेलाच्या बेसुमार वापरामुळे, हवा आणि जलप्रदूषणांत झालेल्या वाढीने सर्वच देश, विशेष करून विकासाच्या वाटेवरील भारतासारखे देश, पर्यावरण ऱ्हासाची मोठी किंमत मोजत आहेत. वातावरणातील विविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होऊन कुठे अनियमित पर्जन्य तर कुठे अतिवृष्टी, चक्रीवादळे, सुनामी यांचे तडाखे बसत आहेत. रासायनिक प्रदूषणामुळे सागरी व नद्यांचे जलस्रोत दूषित होऊन जैविक विविधता नष्ट होण्याचे संकट ओढवले आहे. त्याचे परिणाम इतके भयावह आहेत की अंटार्क्टिकावरील बर्फ वितळण्याबरोबरच भारतातील गंगा नदीच्या प्रवाहाचा जलस्तर घटत असल्याचा इशारा पर्यावरणतज्ज्ञांनी दिला आहे. विशेष म्हणजे युएनडीपीच्या मते भारतावरील पर्यावरणाचे संकट अतिगंभीर आहे. त्याचे कारण जगातील प्राणी व वन्यजीवसृष्टी भारतात सर्वाधिक आहे. हे प्रमाण जागतिक तुलनेत एकदशांश इतके आहे.

वायू आणि जलप्रदूषणाप्रमाणेच ध्वनिप्रदूषण ही एक गंभीर समस्या बनली आहे. वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. नागरीकरण व औद्योगिकीकरणामुळे बांधकामाला प्रचंड वेग आला आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संपत्तीचे उत्खनन व भरण सुरू आहे. पर्यावरणाचे संरक्षक वृक्ष, डोंगर व टेकड्या गायब होत आहेत. तर वाळू उपशामुळे नदी व खाडीचे प्रदूषण वाढले आहे. साहजिकच उद्योग व वाहतुकीमुळे वातावरणातील आवाजाची पातळीही वाढली आहे. त्याचे मानवी जीवसृष्टीवर गंभीर परिणाम दिसून येत आहेत. परिणामी, या समस्येने सर्वांचे लक्ष वेधले आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर याबाबत विचारमंथन सुरू झाले आहे. काही पर्यावरणतज्ज्ञांच्या मते ध्वनिप्रदूषण आरोग्याच्या दृष्टिकोनातून आता दुसऱ्या क्रमांकाचे घातक प्रदूषण बनले आहे. डॉ.डी.डी. ओझा (२००४) यांच्या मते सर्व बाजूंनी आपल्याला आवाजाच्या प्रदूषणाने घेरले आहे. तर मीनाक्षी सिंह या पर्यावरणतज्ज्ञ म्हणतात, पर्यावरण समस्या ही आधुनिक युगाची सर्वांत मोठी समस्या आहे.

ध्वनिप्रदूषणाचे मानवी जीवनावर तसेच पर्यावरणावर विविध परिणाम दिसून येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने बहिरेपणा, संभाषणात व्यत्यय, मानसिक तणाव, थकवा असे दैनंदिन जीवनावर, विशेषकरून आरोग्यावर दुष्परिणाम दिसून येतात. एका अभ्यासानुसार अमेरिकेत ध्वनिप्रदूषणामुळे सुमारे ४०% लोकांना घरी असताना व्यत्यय येतो किंवा निद्रानाशाचा त्रास जाणवतो. भारतात एका पाहणीनुसार मुंबई हे जगातील सर्वांत अधिक ध्वनिप्रदूषण असलेले शहर म्हणून आढळले आहे.

ध्वनिप्रदूषणाचे मानवी जीवनावरच नव्हे तर एकूण जीवसृष्टीवर होणारे परिणाम लक्षात घेऊन सर्वत्र चर्चा सुरू आहे. कारण पर्यावरण हा विषय आता केवळ तज्ज्ञांचा किंवा अभ्यासाचा विषय राहिला नाही. तो

आता आरोग्याचा प्रमुख विषय झाला आहे. गाव असो की मुंबई, दिल्ली, कोलकाता यांसारखी महानगरे, सर्वांनाच आवाजाच्या प्रदूषणाचा त्रास होत आहे. नागरी जीवनातील वेग व उद्योगधंद्याची गरज लक्षात घेता आवाजाचे प्रदूषण पूर्णपणे थांबवणे शक्य नाही. तसा दावा करणे चूक आहे. पण आवाजाचे प्रदूषण नियंत्रणात आणणे मानवाच्या हातात आहे. घर असो की सार्वजनिक ठिकाण, कमीत कमी आवाज करणे, ध्वनिक्षेपण यंत्रणांचा नियमानुसार वापर आणि तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्याला आवाजाचे प्रदूषण रोखणे शक्य आहे. त्याचबरोबर पर्यावरणाच्या नैसर्गिक स्रोताचे संवर्धन करणे, विशेषकरून झाडे लावणे व जगवणे आपल्या हातात आहे. ते केवळ सरकारचे अथवा स्वयंसेवी संस्थांचे काम नाही. ते प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

### ध्वनिप्रदूषण : व्याख्या व विकास

आवाज हा वातावरणाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. दोन किंवा अधिक घटक एकमेकांवर आदळून निर्माण होणारी ऊर्जा म्हणजेच आवाज होय. या ऊर्जेतून जी कंपने निर्माण होतात, ती हवेच्या माध्यमातून वातावरणात पसरतात व कानाद्वारे आपणास ऐकू येतात. निसर्गातील विविध आवाज, जसे ढगांच्या गडगडाट, विजांचा कडकडाट, पावसाची टपटप, रिपरिप आणि घोंघावत वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा सू सू असा आवाज, समुद्राची गाज, पानांची सळसळ, विविध प्राणी पक्ष्यांचे चित्कार आणि आवाज वातावरणात सतत घुमत असतात. वातावरणातील हे विविध आवाज ऐकूनच आपल्याला परिसरातील विविध वस्तू व घटनांचे ज्ञान होते. भाषातज्ज्ञांच्या मते, या घटकांना शाब्दिक रूप देऊन मानव बोलायला शिकला आहे. संवाद, मनोरंजन, ज्ञानप्राप्तीबरोबरच परिसरातील अनेक घातक गोष्टीपासून सचेत राहणे आवाजामुळेच मानवाला शक्य झाले आहे.

मानवी जीवनात आवाजाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्याचे कारण आपण ऐकून बोलायला शिकतो. ऐकायलाच आले नाही, तर बोलणार कसे? कल्पना करा, रस्त्याने जाताना आपल्याला पाठीमागून येणाऱ्या मोटारीचा आवाज ऐकू आला नाही, तर अपघात होऊन गंभीर दुखापत किंवा मृत्युदेखील होऊ शकतो.

### आवाज आणि गोंगाट

आवाज आणि गोंगाट यामध्ये फरक आहे. कानाला गोड वाटणारा, सहन होणारा आवाज जेव्हा एका मर्यादेपेक्षा अधिक तीव्र होतो तेव्हा तो नकोसा वाटतो. थोडक्यात, तो कानाला असह्य होतो. त्यालाच गोंगाट किंवा इंग्रजीत नॉईज म्हणतात. हा नको असलेला आवाज आपण लगेच नाकारतो. जसे रेल्वे स्थानकावर उभे असताना एखादी वेगवान रेल्वेगाडी धाडधाड आवाज करत आपल्यासमोरून वेगाने पुढे जाते, तेव्हा तो आवाज सहन न झाल्याने आपण कानांवर हात ठेवतो किंवा मोटारसायकल किंवा एखादा मोटारवाहक त्याच्या गाडीचा विनाकारणच हॉर्न वाजवतो तेव्हा आपण साहजिकच त्रस्त होतो. नुकत्याच दक्षिण आफ्रिकेत जागतिक फूटबॉल स्पर्धा झाल्या. त्यावेळी प्रेक्षकांनी पिपाणीसारखे वुवुझेला हे कर्कश्श वाद्य वाजवून सर्वांनाच हैराण केले. शेवटी त्यावर बंदी आणण्याची मागणी झाली. त्याचा तो कर्णकर्कश आवाज असो की, आपल्याकडे सणाउत्सवानिमित्त होणारा ढोलताशांचा आवाज, आपल्या सर्वांच्या कानाला काही काळ सुन्न करतो. विशेषकरून उत्तर भारत आणि दिल्लीत पंजाबी लोकांच्या लग्नांत रस्त्यावरून ज्या प्रकारे वाजतगाजत मिरवणुका निघतात, ढोलताशे वाजतात व फटाक्यांची आतषबाजी होते, त्यामुळे काही काळ तरी त्या परिसरात राहणाऱ्या लोकांना आवाज असह्य झाल्याशिवाय राहत नाही. या दरम्यान अनेकांचा रक्तदाब अचानक वाढतो. अनेकदा गरोदर महिलांचे गर्भपात होतात. अन्य दुष्परिणाम जे होतात ते वेगळेच. त्याची चर्चा परिणामांमध्ये केली आहे. ध्वनिप्रदूषणाचा त्रास होण्याचे कारण म्हणजे, सामान्यत: ६० डेसिबलपर्यंतचा आवाज ऐकण्यासाठी सुसह्य असतो. त्यापेक्षा अधिक आवाज त्याची तीव्रता वाढत जाऊन कर्कश किंवा स्फोटक होतो. त्यामुळेच अधिक तीव्र आवाज कानाच्या पडद्यावर आदळून हानी पोचते. श्रवणतज्ज्ञांच्या मते, मानवी ऐकण्याचे प्रमाण प्रत्येक व्यक्तीत व परिस्थितीनुसार वेगळे आहे.

मानवी कानाला असह्य होणाऱ्या किंवा ज्याला नको असलेला आवाज म्हणतात, त्यालाच आपण ध्वनिप्रदूषण किंवा गोंगाट म्हणतो. हा गोंगाट आता सर्वत्र झाला आहे. घराघरांत टीव्ही, रेडिओ किंवा संगीत साधनांचा आवाज घुमत असतो. सण, उत्सव व धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने गदारोळ सुरू असतो. तर सार्वजनिक ठिकाणी वाहने व गर्दीमुळे मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण होते. याबाबत एक तज्ज्ञ प्रा. सहस्रबुद्धे म्हणतात, जो आवाज कानाला गोड लागतो, ऐकत राहावासा वाटतो ते संगीत, आणि ज्या आवाजाने त्रास होतो, डोके दुखायला लागते तो गोंगाट. सामान्य माणसाला आवाज आणि गोंगाट यातील फरक लगेच जाणवतो. मात्र कळते, पण वळत नाही अशी आपली सामाजिक वृत्ती असल्याने विविध कारणांनी आपण त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करतो.

### ध्वनिप्रदूषणाच्या व्याख्या

ध्वनिप्रदूषणाच्या अनेक व्याख्या आढळतात. इंग्रजी पोल्युशन या शब्दाला मराठीत प्रदूषण असा प्रतिशब्द आहे. नॉइज हा शब्द लॅटिन भाषेतील नाऊसीज या शब्दापासून आलेला आहे. त्याचा अर्थ सी सिकनेस असा आहे. एनसायक्लोपिडिया ऑफ ब्रिटानिका (१९६८) आणि अमेरिकाज या शब्दकोशांत, नको असलेला किंवा अनैच्छिक आवाज अशी अनुक्रमे या

ध्वनिप्रदूषण शब्दाची व्याख्या आढळते. दी वर्ल्ड बुक ऑफ एनसायक्लोपिडियामध्ये (१९९०) Noise is random or unwanted sound, अशी व्याख्या आढळते. तर ऑक्सफर्ड इलेस्ट्रेटेड शब्दकोशात Noise - Sound esp. a loud or unwanted or undesired one, अशी व्याख्या दिली आहे.

भारतात पर्यावरण सरंक्षण कायदा, कलम २ (ब) मध्ये प्रदूषणाची व्याख्या दिली आहे. त्यानुसार पर्यावरण प्रदूषण म्हणजे वातावरणात अधिक किंवा घातक स्वरूपात घन, द्राव्य किंवा वायू स्वरूपात एखादा घटक आढळणे होय. (Section 2(b) of the said Act defines environmental pollutnat to means any soild, liquid or gaseous substance present in such concentration as may be, or tends to be injurious to environment.)

ध्वनिप्रदूषण या गंभीर समस्येकडे लक्ष वेधताना निरंजन घाटे (१९९३) हे लेखक म्हणतात, आपल्याकडे दिवसेंदिवस जास्तीत जास्त आवाज करण्याची प्रचंड स्पर्धा सुरू आहे. त्यातून आपले व भावी पिढ्यांचे नुकसान करत आहोत याची आपल्याला कल्पना नाही. किंबहुना, आवाजाचा त्रास होतो हे ठाऊक असूनही आपण पुढील पिढ्यांविषयी अत्यंत बेफिकीर वृत्तीने ध्वनिप्रदूषण चालू ठेवतो.

**आवाजाचे मापन**

आवाजाची क्षमता डेसिबलमध्ये मापन केली जाते. दूरध्वनीचा शोध लावणारे ग्रॅहम बेल यांचे नाव या मापन पद्धतीला दिले आहे. आवाजाचे हे प्रमाणित मापन आहे. श्यून हा या मापनातील सर्वांत कमी आवाज आहे. हे प्रमाण जसजसे वाढत जाते, तसतशी आवाजाची तीव्रता वाढत जाते. मानवी कान 20Hz to 20,000 Hz. पर्यंतचा आवाज ऐकू शकतो. मानवी संभाषणासाठी ६० डीबीपर्यंतचा आवाज सुसह्य आहे. श्रवणतज्ज्ञांच्या मते, सर्वसाधारणपणे शीळ २० डीबी, कार्यालयातील शांतता ४० डीबी, संभाषण ६० डीबी असते. पण ८० डीबीपेक्षा अधिक आवाज कानाला त्रासदायक असतो. मुंबई महानगरासाठी दिवसा ५० आणि रात्री ४० डेसिबल आवाजाचे प्रमाण ठरवण्यात आले आहे.

**ध्वनिप्रदूषणाची कारणे व स्रोत**

**वाहतुकीमुळे होणारे ध्वनिप्रदूषण**

वाहतुकीमुळे होणारे ध्वनिप्रदूषण हे आधुनिक जगात ध्वनिप्रदूषणाचे सर्वांत मोठे कारण आहे. वाढते नागरीकरण आणि रस्त्यावरील आधुनिक वेगवान वाहनांची प्रचंड संख्या मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषणाला कारण ठरली आहेत. कार, ट्रक, मोटारसायकली, बसेस यांचे आवाज आणि त्यातून होणारे वायुप्रदूषणही पर्यावरणासाठी गंभीर समस्या बनले आहे.

**सैनिकी हालचाली –** कमी उंचीवरून रोरावत जाणारी लढाऊ विमाने, रणगाडे व अन्य सैनिकी हालचालींमुळे ध्वनिप्रदूषणात जगभर वाढ होत आहे. बंदुकीचे आवाज, गोळीबार आणि बॉम्बस्फोटामुळे मोठ्या प्रमाणात वायुप्रदूषण व ध्वनिप्रदूषण होत आहे.

**रेल्वे वाहतूक –** रेल्वेमार्गावरून होणारी वाहतूक, रेल्वे इंजिनांचा आवाज, गतीमुळे होणारा रेल्वे मार्गाचा खडखडाट, सामानाची व प्रवाशांची चढउतार आणि गोंगाट यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनिप्रदूषण होते. रेल्वेमार्गाच्या बाजूला राहणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणात या ध्वनिप्रदूषणाचा फटका बसतो.

**बांधकाम –** उद्योग/व्यवसाय वा मानवी निवाऱ्यासाठी घरांची गरज लक्षात घेता जगात सर्वत्र नागरीकरणाचा वेग वाढला आहे. मोठमोठ्या इमारती, रस्ते व महामार्ग, व्यावसायिक संकुले उभी राहत आहेत. या बांधकामांसाठी विविध यंत्रसामुग्री व वाहने उपयोगात येत आहेत. बांधकाम करताना विविध स्तरांवर होणारे आवाज ध्वनिप्रदूषणाचे स्रोत आहेत.

**औद्योगिकीकरण –** कारखान्यातील यंत्रसामुग्री, मोटार, कंप्रेशन मोठ्या प्रमाणावर आवाजाचे प्रदूषण करतात.

**घरगुती साधने –** गतिमान जीवन जगणाऱ्या माणसाच्या मदतीला आज अनेक आधुनिक उपकरणे व साधने हात जोडून उभी आहेत. वातानुकूलित यंत्रणा, पंखे, व्हॅक्युम क्लीनर ते किचन अप्लायनसेंसपर्यंत ही साधने वातावरणातील प्रदूषणात भर घालतात.

**सण, उत्सव व समारंभ –** सण, उत्सव व समारंभ हा ध्वनिप्रदूषणाचा एक मोठा स्रोत आहे. या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाऊड स्पीकर, वाद्ये वाजवणे, मिरवणुका, फटाके व आतषबाजी केली जाते. आपल्याकडे गणेशोत्सव, नवरात्री, माऊंट मेरीची यात्रा, मोहरम आदी प्रसंगी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे अनेक पाहण्यांमधून दिसून आले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने गणेशोत्सवादरम्यान होणारे आवाजाचे प्रदूषण अभ्यासण्यासाठी २००६ साली ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान महाराष्ट्रातील प्रमुख बारा ठिकाणी पाहणी केली. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली, नाशिक, नगर, सातारा, औरंगाबाद, अमरावती, कोल्हापूर आणि रायगड यांचा त्यात समावेश आहे. या पाहणीत गणेशोत्सवादरम्यान आवाजाची पातळी निर्धारित पातळीपेक्षा अधिक आढळून आली. निर्धारित पातळी दिवसा ५० डेसिबल आहे.

अशीच पाहणी २००७ साली करण्यात आली. गणेशविसर्जनाच्या दिवशी प्रदूषण सर्वाधिक आवाजाचे होते. हे प्रदूषण १२० डेसिबलपर्यंत असल्याचे या पाहणीत आढळून आले.

दरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला २००७ व २००८ च्या तुलनेत २००९ मध्ये दिवाळी दरम्यान आवाजाची पातळी कमी असल्याचे दिसून आले. प्रसार माध्यमांद्वारे होणारी जनजागृती, लोकसहभाग, स्वयंजागृती आणि सरकारी यंत्रणाचा सक्रिय सहभाग यामागची कारणे असल्याचे या पाहणीच्या निष्कर्षात म्हटले आहे.

याबाबत ढोलताशे या नाटकाचे दिग्दर्शक विजय केंकरे (२०००) म्हणतात, धर्माचे आपल्या जीवनातील नेमके स्थान समजावून न घेता त्याचे सार्वजनिक जीवनात ओंगळ प्रदर्शन करण्याची मानवी प्रवृत्ती असल्याने सर्वत्र अतिरेक दिसून येतो.

**ध्वनिप्रदूषणाचे परिणाम**

ध्वनिप्रदूषण किंवा नको असलेल्या आवाजाचे शारीरिक आणि मानसिक (वर्तणूक) असे दोन परिणाम प्रामुख्याने आढळतात. आवाज आणि आरोग्य यांचा सरळ संबंध असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले आहे. ध्वनिप्रदूषणामुळे जे परिणाम संभवतात त्यात ताणतणावामुळे येणारे आजारपण, उच्च रक्तदाब, संवादातील किंवा संप्रेषणातील अडथळे, बहिरेपणा, निद्रानाश, आणि उत्पादन क्षमतेत घसरण आदी प्रमुख कारणांचा समावेश आहे. नॉईज इनड्युसूड हिअरिंग लॉस हे आरोग्यावर परिणाम करणारे सामान्य व सर्वाधिक चर्चिले जाणारे कारण आहे. मात्र सातत्याने किंवा मोठ्या आवाजाच्या पातळीवर आवाज ऐकल्याने आरोग्यावर विविध घातक परिणाम होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. त्यातील काही दुष्परिणामांची चर्चा पुढील प्रमाणे आहे.

**शारीरिक परिणाम**

**कानात आवाज गुणगुणणे (टिनायटस)–** कानात किंवा मस्तकात कमी अधिक प्रमाणात गुंजणारा/गुणगुणारा किंवा अन्य प्रकारच्या आवाजाला टिनायटस म्हणतात. अनेक केसेसमध्ये हा प्रकार गंभीर मानला जात नाही. मात्र तो एक त्रासदायक परिणाम असल्याचे दिसून येते. मोठ्या आवाजाचे प्रमाण हे त्याचे कारण आहे. दुर्दैवाने अनेक लोक मोठ्या आवाजाबाबत, खास करून लाउड स्पीकर, फटाके, ढाणढाण वाजणारे संगीत या ध्वनिप्रदूषण करणाऱ्या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

**श्रवणदोष –** नॉईज इनड्युसूड हिअरिंग लॉस हा श्रवणदोष एकाच वेळी मोठा आवाज कानावर आदळून होऊ शकतो, तसाच तो सतत आवाजाची मोठी पातळी असलेल्या वातावरणात अधिक काळ राहिल्यानेही होतो. या प्रकारात अंतकर्णातील कॉकलियातील सूक्ष्म सेलची हानी होते. ह्या सेल ऑडिटरी नर्व्हला, मेकॅनिकल साऊंड व्हायब्रेशनला प्रतिसाद म्हणून इलेक्ट्रिकल सिग्नल पाठवत असतात. या हेअर सेलचे विविध गट विविध फ्रिक्वेंसीसाठी काम करतात. मानवी कान 20,000 Hz. पर्यंतचा आवाज ऐकू शकतो. मात्र त्यापेक्षा अधिक आवाज हेअरसेलचे नुकसान करतात. अधिक प्रमाणात त्यांचे नुकसान झाले तर त्याचा परिणाम श्रवणदोषात होतो. त्यामुळेच कॉकलियातील हायफ्रिक्वेंसी भागाचे ध्वनिप्रदूषणामुळे नुकसान होताना आढळते.

**रक्ताभिसरणावर परिणाम–**ध्वनिप्रदूषणाचे मानव आणि अन्य सस्तन प्राण्यांवर अल्प आणि दीर्घकालीन असे दोन्ही प्रकारचे परिणाम होतात. इन्डोक्राइन आणि ऑटोनामिक
नर्व्हज् सिस्टीमद्वारे हे परिणाम होतात.

**रक्तदाब –** अनेक अभ्यासांतून असे दिसून आले आहे की ८५ डेसिबलपेक्षा अधिक आवाजाची पातळी असलेल्या वातावरणात राहणाऱ्या व्यक्तींना उच्च रक्तदाबाचा त्रास होतो.

**हृदयविकार –** उच्च आवाजाची पातळी असलेल्या वातावरणात राहिल्याने रक्ताभिसरणावर परिणाम होतो. सतत आठ तासांपेक्षा अधिक काळ अशा वातावरणात राहणाऱ्या व्यक्तींना उच्च रक्तदाबाचा त्रास होतो, असे आढळून आले आहे. याचा अंतिम परिणाम हृदयविकारात (कॉरोनरी आर्टरी डिसीजेस) होतो.

**मानसिक (वर्तणूक) परिणाम**

**चिडचिडेपणा –** ध्वनिप्रदूषणामुळे सतत कामात किंवा संभाषणात व्यत्यय आल्याने चिडचिडेपणा येतो. हा कमीत कमी परिणाम करणारा असला तरी त्यातून मोठ्या आवाजाबाबत अनाठायी निर्माण होणारी भीती मात्र त्रासदायक ठरते. या अनाठायी भीतीमुळेच घरातील फ्रीजचा आवाज किंवा ग्रंथालयातील अगदी हळूवार आवाज देखील नकोसा वाटतो. कधी कधी अगदी कमी आवाजानेदेखील काही व्यक्तींची झोपमोड होते. ध्वनिप्रदूषणाबाबत अतीव दक्षता किंवा ते रोखण्याबाबत काय करता येईल याची काळजी चिडचिडेपणाचे कारण बनू शकते.

**रक्तदाब वाढणे –** विमानसेवा किंवा रेल्वेमुळे अधिकतर लोकांना ध्वनिप्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. त्याचा परिणाम आरोग्यावर होऊन अनेक लोकांना रक्तदाबाचा त्रास जाणवत असल्याचे दिसून येते. ध्वनिप्रदूषणामुळे शरीर आणि मनावर ताण निर्माण होत असल्याने त्याचा परिणाम उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि हृदय बंद पडणे असा गंभीर होताना आढळतो.

**ध्वनिप्रदूषणाचे प्राणिमात्रावर होणारे परिणाम**

ध्वनिप्रदूषणाचे सर्वांत घातक परिणाम प्राणिजगतावर होत आहेत. वन्यप्राणी जंगलात, नागरी वस्तीपासून दूर, निवांत निसर्गाच्या सान्निध्यात वास करतात. मात्र नागरीकरण व जंगलतोडीमुळे अनेक वन्यजीवांचा निवारा नष्ट झाला आहे. जंगलातून जाणारे महामार्ग, रस्ते, जंगलातील अतिक्रमण यामुळे वातावरणातील आवाजातील पातळी वाढली आहे. वन्यजीवांची श्रवणक्षमता मानवापेक्षा अधिक संवेदनशील असल्याने या अधिक आवाजाचा त्यांच्यावर जास्त परिणाम होत आहे. ही आवाजाची पातळी ८५ डेसिबलपेक्षा अधिक वाढल्याने अनेक प्राण्यांच्या श्रवणक्षमतेवर दुष्परिणाम झाला आहे. त्यांच्या ऐकू येण्याच्या क्षमतेवर परिणाम झाल्याने पर्यावरणातील संकेत व प्राण्यांचे इशारे समजण्यास अडचणी येत आहेत.

प्राण्यांच्या श्वासोच्छ्वास व हृदयावर– देखील ध्वनिप्रदूषणाचे सर्वांत घातक परिणाम जाणवत आहेत. तसेच प्राण्यांच्या

वर्तणुकीवर परिणाम होऊन ती कधी-कधी आपल्या हद्दीतून भरकटताना दिसतात. कधी-कधी जंगलातून जाणाऱ्या मार्गावर आल्याने वाहनांचा आवाज ऐकून बिचकतात व सैरावैरा धावून अपघातात बळी पडतात. ती कधी नागरी हद्दीत प्रवेश करतात तज्ज्ञांच्या मते, या प्रदूषणाचा त्यांच्या प्रजननावर, परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे. काही प्रजाती तर नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

**ध्वनिप्रदूषण : प्रतिबंधक उपाय**

ध्वनिप्रदूषणाबाबत प्रतिबंधक उपाय आपल्याला शांत जीवन देण्याबरोबरच या समस्येला सामोरे जावे लागणाऱ्या लोकांनाही त्यापासून वाचवणार आहेत. याबाबत प्रसिद्ध लेखक मोहन आपटे म्हणतात, लयबद्ध, सुमधुर आणि हलक्या आवाजातील ध्वनी माणसाच्या मनाला भुरळ घालतो, पण बेसूर, कर्कश्श आणि अतिउच्च स्वरातील ध्वनी आपल्याला नकोसा होतो. असे असूनही दररोज असे नको असलेले ध्वनी आपल्याला सक्तीने ऐकावे लागतात.

ध्वनिप्रदूषण रोखण्यात तंत्रज्ञानाची भूमिका मोलाची आहे, कारण तंत्रज्ञानाच्या मदतीने ध्वनिप्रदूषणाचे स्रोत मर्यादित करणे शक्य आहे. जसे, प्रदूषण निर्माण करण्यात अडथळे तयार करणे, दाट लोकसंख्येच्या भागातील वाहतुकीसाठी ध्वनिप्रदूषण न करणारी नवीन वाहतूकप्रणाली तयार करणे. तसेच बांधकामादरम्यान होणारे आवाजाचे प्रदूषण रोखण्यासाठी इमारतीच्या आराखड्यामध्येच बदल करणे, वाहनांमध्ये आवाज न करणारी यंत्रे बसवणे. औद्योगिक संयंत्रांचे आवाज नियंत्रित करण्यासाठीही तंत्रज्ञानाची मदत होऊ शकते.

**कायदेशीर उपाय योजना**

सरकारने विविध नियम आणि अधिनियमांच्या माध्यमातून ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाय योजले आहेत. त्याचबरोबर अनेक महानगरांनी ध्वनिप्रदूषण होऊ नये यासाठी स्वतंत्र नियम लागू केले आहेत. यामध्ये बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांवर मर्यादित वापराची तरतूद, भोंगे किंवा लाउडस्पीकर लावण्याबाबत परवानगी यांसारखे काही नियम आहेत. तसेच, वृक्षरोपण यांसारखेही उपाय केले जात आहेत.

**१. भारतीय राज्य घटना –** भारतीय राज्य घटनेतील कलम २१ प्रत्येक नागरिकाला जीवन जगण्याची हमी आणि वैयक्तिक स्वातंत्र्य देते. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या पुनरुच्चारानुसार कलम २१ मधील जीवनाचा हक्क केवळ जिवंत राहणे किंवा अस्तित्वापुरता मर्यादित नाही तर तो प्रत्येक नागरिकाला प्रतिष्ठेचे जीवन जगण्याची हमी देणारा आहे. जो कोणी आपल्या घरात शांततेने, आरामदायी किंवा निर्विघ्नपणे राहू इच्छितो त्याला हानिकारक ध्वनिप्रदूषणाला प्रतिबंध करण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**२. माहितीचा अधिकार –** पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या उद्योगांना कोणत्या नियम व अटींवर परवानगी दिली याची माहिती सरकारकडून मागवण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे.

**३. धार्मिक हक्क आणि ध्वनिप्रदूषण –** धार्मिक हक्क म्हणजे धार्मिक कार्यक्रमामध्ये लाउडस्पीकर किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर आवाज किंवा ध्वनिप्रदूषण करणे याचा अधिकार नव्हे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ध्वनिप्रदूषणावर सुनावणी करताना ७ नोव्हेंबर २००७ रोजी न्यायालयाने हे मत व्यक्त केले आहे.

**४. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे –** यामध्ये राज्याचे उद्दिष्ट ध्वनिप्रदूषणरहित पर्यावरण ठेवण्याचे असावे असे निर्देश दिले आहेत.

**५. मूलभूत हक्क –** स्वच्छ पर्यावरण हा देशातील प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे.

**६. सीआरपीसी कलम १३३ –** सीआरपीसी कलम १३३ अन्वये दंडाधिकाऱ्यांना ध्वनिप्रदूषणाला कारणीभूत होणारे घटक दूर करण्याबाबत किंवा रोखण्याबाबत आदेश जारी करण्याचे अधिकार दिले आहेत. सीआरपीसी कलम १३३ अन्वये कार्यकारी दंडाधिकाऱ्याला प्रदूषणाचे स्त्रोत घटकांबाबत हस्तक्षेप आणि त्याला प्रतिबंध करण्यासाठी प्रथम काही अटींवर ते चालू ठेवणे आणि नंतर कायमस्वरूपी बंद करण्याचे अधिकार दिले आहेत. ही तरतूद आवाजाचे प्रदूषण करणाऱ्या घटकांवर कार्यवाही व मानवी जीवाची सुरक्षा व आरोग्याला धोका निर्माण होऊ नये याबाबत संबंधित व्यक्तीला प्रतिबंध करण्यासाठी आहे.

**७. भारतीय दंड विधान : सार्वजनिक ठिकाणी आवाजाचे प्रदूषण २६८–२९५**

भारतीय दंड विधानातील भाग चार हा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षा, सभ्यता आणि नैतिकता याच्याशी संबंधित कलम २६८, २७०, २७९, २८०, २८–२८८, २९०, २९१ आणि २९४ कलमांशी संबंधित आहेत. ध्वनिप्रदूषण करणाऱ्याविरुद्ध वरील कलमांनुसार कारवाई होऊ शकते.

**८. लॉ ऑफ टॉर्ट –** या कायद्यान्वये आवाजाच्या प्रदूषणाविरोधात नुकसान भरपाई मिळण्यासाठी दिवाणी दावा दाखल करता येतो.

**९. फॅक्टरी ॲक्ट, १९४८ –** या कायद्याचे कलम ११(१) अन्वये प्रत्येक कारखान्यात स्वच्छता ठेवणे, तसेच कोणत्याही प्रकारचे आवाजाचे प्रदूषण होणार नाही याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. या कायद्याच्या कलम ३५ अन्वये कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांच्या सुरक्षिततेबाबत संरक्षण दिले आहे. मात्र कानाच्या सुरक्षेबाबत अशी कोणतीही तरतूद नाही.

**१०. मोटार व्हेईकल ॲक्ट, १९८८ –** मोटार व्हेइकल ॲक्ट, १९८८ या कायद्याच्या कलम २०, २०(१) ४१, ६८,

६८(१), (७०), (९१) आणि १११ नुसार राज्य सरकारला वाहनाद्वारे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या नियंत्रणाचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

**११. दी एअरक्राफ्ट ॲक्ट, १९३४ –** केंद्र सरकारला या कायद्यान्वये सर्व प्रकारच्या विमानांची निर्मिती, देखभाल व वापर, आयात-निर्यात आणि विमानसेवा अधिनियम तयार करण्याचे सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

**१२. ध्वनिप्रदूषण नियंत्रण अधिनियम २००० –** ध्वनिप्रदूषण नियंत्रणाची आवश्यकता आणि याबाबत विशेष कायदा करण्यासाठी सातत्याने दबाव आल्याने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६च्या कलम ३ मध्ये भर घालून ध्वनिप्रदूषण नियंत्रण अधिनियम २००० तयार करण्यात आले आहे.

पर्यावरण संरक्षणासंबंधी सर्व विषयांना हाताळण्याच्या दृष्टीने हा एकछत्री कायदा आहे. या कायद्याने प्रत्येक विभागासाठी आवाजाची पातळी ठरवून दिली आहे. शाळा, न्यायालये, दवाखाने यांच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारच्या ध्वनिप्रदूषणाला मनाई करणारे शांतता विभाग स्थापन करण्यात आले आहेत. अन्य विभागांसाठी पुढील प्रमाणे

| विभाग | विभागाचा प्रकार | डेसिबल मर्यादा (दिवसा) | रात्री |
|---|---|---|---|
| अ | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| ब | व्यावसायिक | ६५ | ५५ |
| क | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ड | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

मुंबई शहराची घनता लक्षात घेता हे शहर शांतताक्षेत्र म्हणून घोषित केले आहे. त्यानुसार या शहरातील आवाजाची पातळी दिवसा ५० डेसिबल आणि रात्री ४० डेसिबल पर्यंत मर्यादित केली आहे.

**या अधिनियमातील काही महत्त्वपूर्ण तरतुदी**

१. कोणत्याही अधिकाऱ्याला रात्री १० ते सकाळी ६.०० या वेळेत खुल्या जागेत सार्वजनिक ध्वनिक्षेपण यंत्रणा वापरण्यासाठी परवानगी देता येणार नाही. फक्त जिल्हा दंडाधिकारी बंदिस्त जागेतील कार्यक्रमासाठी १० वाजेनंतर परवानगी देऊ शकतात.

२. परवानगी दिल्यानंतर आवाजाची मर्यादा ध्वनिप्रदूषण नियंत्रण अधिनियमानुसारच असावी. साऊंड मीटरद्वारे आवाजाचे मापन होते. या अधिनियमांचा भग करणाऱ्या व्यक्तीला या कायद्याने अटक होऊ शकते.

३. जर प्रशासनाने ध्वनिप्रदूषण नियंत्रण रोखण्यासाठी उचित कार्यवाही नाही केली तर कोणीही नागरिक ६० दिवसांची नोटीस देऊन न्यायालयात दाद मागू शकतो. न्यायालय या प्रकरणी कारवाई करू शकते.

**सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वपूर्ण निर्णय**

सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिप्रदूषणा-बाबत निकाल देताना म्हटले आहे, की भारतीय राज्य घटनेतील कलम २१ अन्वये दिलेला जीवन जगण्याचा अधिकार हा केवळ जगणे किंवा अस्तित्वापुरता मर्यादित नाही. तर तो प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार देतो. त्यामध्ये नागरिकाला सर्व प्रकारे अर्थपूर्ण आणि प्रतिष्ठेने जीवन जगण्याची हमी दिलेली आहे. जो प्रत्येकजण आपल्या घरात शांततापूर्ण, आरामदायी आणि निवांत जीवन जगू इच्छितो त्याला ध्वनिप्रदूषणापासून संरक्षणाचा अधिकार आहे. कोणत्याही नागरिकाला आपल्या शेजाऱ्याला किंवा इतरांना त्रास होईल अशा रीतीने आपल्या घराच्या हद्दीतदेखील ध्वनिप्रदूषण करण्याचा अधिकार नाही. (९ नोव्हेंबर २००७ चा लाऊडस्पीकर वापरण्याबाबतचा निकाल)

न्यायालयाने अलीकडेच एका निकालात नुकसानभरपाईचा दावा मान्य केला. एका कारखान्यात एका मुलीवर अत्याचार झाला. या मुलीने केलेली मदतीची याचना कारखान्यातील यंत्राच्या आवाजामुळे कोणालाच ऐकू न गेल्याने तिला वेळेवर मदत मिळाली नाही. या प्रकरणी न्यायालयात दाद मागितली असता न्यायालयाने ध्वनिप्रदूषणाचे कारण ग्राह्य धरून नुकसानभरपाई मान्य केली.

**जागतिक आरोग्य संघटनेची मार्गदर्शिका**

जागतिक आरोग्य संघटनेने १९८६ पासून ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार आरोग्याच्या दृष्टीने काही उपाययोजना करण्याच्या हेतूने मार्गदर्शिका तयार केली आहे. ध्वनिप्रदूषणाचे व्यवस्थापन करण्यासाठी आवाजाचे प्रमाणीकरण करणे हा त्यामागे प्रमुख उद्देश आहे. या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी होण्यासाठी पुढील शिफारशी केल्या आहेत:

१. सरकारने पर्यावरण संरक्षण नीतीचा एक भाग म्हणून जनतेचे ध्वनिप्रदूषणापासून संरक्षण केले पाहिजे.

२. ध्वनिप्रदूषण कमी करण्यासाठी सरकारने लघु, मध्यम आणि दीर्घकालीन स्वरूपाचे उपाय करण्यासाठी कृतिकार्यक्रम अंमलात आणले पाहिजेत.

३. दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणून सरकारने आरोग्यविषयक मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी केली पाहिजे.

४. पर्यावरणाच्या परिणामांचा आढावा घेताना महत्त्वपूर्ण आरोग्य विषय म्हणून सरकारने ध्वनिप्रदूषणाचा त्यात समावेश केला पाहिजे.

५. आवाजाची पातळी कमी करण्यासाठी

विधेयक आणणे आणि सध्या असलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणे.
६. महापालिकांनी आवाजाची पातळी कमी करणाऱ्या योजना अंमलात आणाव्यात.
७. सरकारने याबाबतच्या धोरणांवर आधारित संशोधनाला पाठिंबा द्यावा.

**आपणही आवाजाचे प्रदूषण कमी करू शकतो**

१. आपल्या वाहनाचा हॉर्न विनाकारण आणि विशेषकरून शाळा, न्यायालये, दवाखाने यांच्या परिसरात वाजवू नका.
२. आपल्या आणि इतरांच्या कानांना त्रास होईल असे संगीत वाजवू नका. आपल्या घरातील दूरचित्रवाणी किंवा रेडिओचा आवाज कमी ठेवा.
३. मोठा आवाज करणारे व विषारी वायू निर्माण करणारे फटाके वाजवू नका.
४. मोटारी, यंत्रे आणि वाहनांची योग्य देखभाल न केल्यास ती मोठ्या प्रमाणात आवाजाचे प्रदूषण निर्माण करतात. त्यासाठी त्यांची वेळेवर दुरुस्ती व देखभाल करा.
५. आपण आवाजाची पातळी अधिक असलेल्या परिसरात काम करत असाल तर कानाच्या संरक्षणासाठी कानसंरक्षक (एअर प्लग) वापरा.
६. जेव्हा काम नसेल तेव्हा तुमच्या कारचे इंजिन बंद ठेवा. त्यामुळे आवाजाची पातळी कमी ठेवण्यास मदत होते.
७. शक्य असेल तर पायी किंवा सायकलने प्रवास करा. वायू आणि आवाजाचे प्रदूषण कमी होण्यास त्यामुळे निश्चितच हातभार लागेल.
८. सार्वजनिक ठिकाणी मोठ्याने बोलणे, ओरडणे किंवा गोंगाट करणे टाळा.
९. अधिकाधिक वृक्षारोपण करा. झाडे ही पर्यावरणसंरक्षक आहेत.


**संदर्भ**


१. Koch, Scarcity of Silence, www.marisys.com/noise Robrer pollution.
२. Lisa Goines, RN and Louis Hagler, Southern Medical Journal, Volume 100 : March 2007, Pages 287-294.
३. डॉ. डी.डी. ओझा, ध्वनिप्रदूषण, ज्ञानगंगा प्रकाशन, नई दिल्ली (२००४)
४. मीनाक्षी सिंह, राधा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००७, पृ.९
५. प्रा.श.के. सहस्रबुद्धे, पर्यावरण व प्रदूषण, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई (२०००) पृ.३०
६. दी वर्ल्ड बुक ऑफ इनसायक्लोपिडीया (१९९०) पृ.४५५
७. ऑक्सफर्ड इलेस्ट्रेड शब्दकोश ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, २००३, पृ.५५४
८. निरंजन घाटे, प्रदूषण, स्नेहवर्धक प्रकाशन, पुणे (१९९३)
९. ढोलताशे या नाटकाचे दिग्दर्शक विजय केंकरे (२०००)
१०. http/www/naturesoundorg./conservation &wwhtml.
११. मोहन आपटे, मला उत्तर हवंय, राजहंस प्रकाशन, मुंबई, २००९, पृ.१६१.
१२. Supreme court Judgment on Noise pollution 7 November 2007. CIMOGG publication, http/cimogg.srilanka.org.



**त्र्यंबक दुनबळे**
जनमाध्यम प्रसारण अधिकारी
अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई
मो. नं. ९८९६७ २३८९४






*असाही महाराष्ट्र*

**संदेश भंडारे**

संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांचं विचारप्रवर्तक पुस्तक. मध्यमवर्गीय कक्षेबाहेरचा एक मोठा समाज त्यातून मूर्त झालेला आहे. सर्वसाधारण शहरी माणसाच्या विचारापलीकडचा महाराष्ट्र इथे साकार झाला आहे… वसंत आबाजी डहाके यांची प्रस्तावना त्याचे महत्त्व विशद करते.


**मूल्य ३५० रुपये**

**सवलतीत २०० रुपये**

# ‘डायरी‘ला अभूतपूर्व प्रतिसाद

## प्रवीण बर्दापूरकर

डायरी हा कॉलम ‘लोकसत्ता’त कसा सुरू झाला, हे माझ्या ‘डायरी’ पुस्तकातील ‘बिटवीन द लाइन्स’मध्ये आलं आहेच. कॉलम प्रकाशित होत असताना खूप लोक फोन करायचे, काही इमेल पाठवायचे तर काही पत्रं. पत्रकाराचा एखादा कॉलम प्रकाशित होत असला की अशा प्रतिसादांपैकी ७५ टक्के प्रतिसाद हा पत्रकाराला अपेक्षितच असतो. कारण त्याच्याशी दैनंदिन संबंध असणाऱ्या राजकारण, प्रशासन, साहित्य आदी क्षेत्रांत वावरणाऱ्यांना त्या मजकुराची प्रशंसा करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो! उगाच पंगा कशाला घ्या, असा अतिशय धोरणी हेतू त्यामागे असतो. विशेषत: पोलिटिकल रिपोर्टिंग करणाऱ्या पत्रकाराशी तर पंगा घेणं परवडणारंच नसतं. उर्वरित २५ टक्के प्रतिसाद मात्र गंभीर असतो. तो देण्यामागे विशिष्ट हेतूही असतो. उदाहरणच द्यायचं झालं, तर कॉलममधील मजकुरात तपशिलाची अपवादानं का असेना एखादी चूक आढळली तर त्या काळी वरिष्ठ असलेले दिनकर रायकर लगेच फोन करून ती चूक दुरुस्त करत असत. गोवारी हत्याकांडाच्या संदर्भात लिहिलेल्या मजकुरानंतर अजूनही तो प्रश्न न सुटल्याबद्दल हळहळ व्यक्त करणारे बरेच फोन आणि मेल आले, तर अविनाश पांडे या तेव्हा तरुण असणाऱ्या काँग्रेस आमदारावर एका सनदी अधिकाऱ्याला मारहाण केल्याचं प्रकरण पत्रकारांनी कसं विनाकारण ताणलं आणि त्याचे परिणाम अविनाश पांडेला त्याच्या राजकीय जीवनात कसे भोगावे लागले याचं ‘कन्फेशन’ लिहिल्यावर महाराष्ट्रातून कमीतकमी चारशेपेक्षा जास्त लोकांनी फोन करून प्रतिसाद दिला. श्रीकांत जिचकार या आता दिवंगत झालेल्या नेत्याची एकेकाळी केवढी मोठी क्रेझ होती, हे जसं त्या प्रतिसादातून लक्षात आलं, तसंच, अविनाश पांडे प्रकरण पत्रकारांनी एका कर्मचारी संघटनेच्या नेत्याच्या नादी लागून विनाकारण अती ताणून धरल्यानं महाराष्ट्राच्या




राजकारणात असणाऱ्या श्रीकांत जिचकार गटाच्या नेते–कार्यकर्त्यांचं खच्चीकरण किती मोठ्या प्रमाणावर झालं हे जाणवलं. आपण कबुलीजबाब देण्यात काहीच चूक केली नाही याचं मिळालेलं समाधान असं होतं आणि तरुण राजकारण्यांच्या खूप मोठ्या गटाला महाराष्ट्र काँग्रेसमधून कसं हद्दपार व्हावं लागलं, याची त्यातून झालेली सल मन कुरतडणारी ठरली. ‘कन्फेशन’ प्रकाशित झालं तेव्हा अविनाश पांडे महाराष्ट्रात नव्हता, पण वेबसाईटवर मजकूर वाचून त्याचा सद्‌गदित होऊन फोन आला. यात फार काही आश्चर्यकारक नव्हतं. मात्र, नागपूरला आल्यावर तो जेव्हा एक पुष्पगुच्छ घेऊन भेटायला आला आणि ज्या अगत्यानं त्यानं कृतज्ञता व्यक्त केली त्यामुळे डोळ्यांच्या कडा ओलावल्या नसत्या तरच नवल होतं. राजकारणात वावरणाऱ्यांकडून असं वर्तन अपेक्षित ठेवण्याचे दिवस आता निघून गेले आहेत. राज्यसभेत निवड झाल्यावरही अविनाश पांडे त्याच अगत्यानं कार्यालयात येऊन गेला आणि असं कन्फेशन सर्वच पत्रकारांना देता येत नाही अशी पावती देऊन गेला.

सर्वाधिक प्रतिसाद मिळाला तो फुलनदेवीच्या शरणागतीचा अनुभव सांगणाऱ्या डायरीला. या मजकुराची एक उल्लेखनीय आठवण आहे. हा मजकूर लिहिला तेव्हा मुख्यमंत्री कोण, ‘अर्जुनसिंग की व्ही.पी. सिंग’ असा काहीसा संभ्रम मनात होता. फुलनदेवीच्या शरणागतीच्या दिवशी मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री अर्जुनसिंगच हजर होते, ही माहिती ज्येष्ठ सहकारी चंद्रकांत ढाकुलकर यानं कन्फर्म केली. त्याप्रमाणे मजकुरात दुरुस्ती केली आणि आम्ही चहासाठी टपरीवर गेलो. ‘लोकसत्ता’च्या नागपूर कार्यालयाच्या गेटसमोर असणाऱ्या टपरीवर चहा घेत असतानाच हृदयविकाराचा त्रास झाला आणि तिथूनच सरळ हॉस्पिटलमध्ये रवाना झालो. तो साधा त्रास नव्हता तर, हार्ट ॲटॅक होता. मग शस्त्रक्रिया वगैरे सर्व सोपस्कार पार पाडले आणि हॉस्पिटलमध्ये असण्याच्या काळात ईमेलवर येणाऱ्या प्रतिसादाला उत्तरच देता आलं नाही. फुलनदेवीच्या शरणागतीवर दोनशेहूनपेक्षा जास्त मेल आले आणि ओळखीच्या किती लोकांचे फोन आले याची मोजदाद ठेवणं लेकीनं, माझ्या प्रकृतीच्या काळजीपायी सोडूनच दिलं!

‘डायरी’या कॉलममुळे बरीच वर्षं ‘आऊट ऑफ रेंज’ असणारे अनेक जण पुन्हा ‘रीच’ मध्ये आले, हे महत्त्वाचं. यात अगदी आवर्जून उल्लेख करायचा झाला तर बबनराव ढाकणे यांचा करायला हवा. राजकारणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर होऊन बबनराव ढाकणे यांना दोन दशकं उलटली आहेत. आता नेमकं आठवत नाही, पण कुठल्यातरी एका

मजकुरात जो उल्लेख होता तो वाचल्यावर, प्रयासानं माझा नंबर शोधून त्यांनी केवळ मजकुराला प्रतिसादच दिला नाही तर जुन्या स्नेहबंधांनाही उजाळा दिला. दै. 'सागर'चे नाना जोशी आणि भालचंद्र दिवाडकर यांच्याबाबतही असंच घडलं. जॉनी जोसेफ, रमेशकुमार आणि उल्हास जोशी या सनदी अधिकाऱ्यांबद्दल तेच घडलं. खरं तर, उल्हास जोशींशी अतिशय नियमित असलेला संपर्क का तुटला हेच कळलं नव्हतं. पण डायरीनं हे स्नेही पुन्हा मिळवून दिले, हे मात्र खरं. अजित दळवी नाटककार म्हणून आणि गंभीर वाचक म्हणून परिचित आहेच. डायरीतल्या जवळजवळ प्रत्येक मजकुराला अजितचा नियमित मिळणारा प्रतिसाद सुखद धक्काच होता.

'डायरी' ग्रंथालीनं पुस्तक स्वरूपात प्रकाशित केली आणि त्याचा प्रकाशन समारंभ मुंबई तसंच नागपूर अशा दोन ठिकाणी झाला. मुंबईच्या कार्यक्रमात कुमार केतकर नेहरूवादावर अभ्यासपूर्ण आणि चांगलं बोलले, यात नाविन्य असं काहीच नव्हतं. धक्का होता तो सुशीलकुमार शिंदे यांच्या 'डायरी'तील मजकुराचे असंख्य संदर्भ देणाऱ्या भाषणाचा. बिटवीन द लाइन्समध्ये मी जे माझं पूर्वायुष्य लिहिलं आहे त्यातल्या खाचाखोचा शिंदे यांना ज्या पद्धतीनं कळल्या होत्या, त्यावरून राजकारणात एवढ्या मोठ्या पदावर पोचूनही शिंदे यांच्यातील संवेदनाशील माणूस अजून जिवंत आहे, याची खात्री पटली. नागपूरच्या कार्यक्रमात कुमार केतकर, पुष्पा भावे आणि भास्कर लक्ष्मण भोळे अशी विलक्षण जुगलबंदी होती आणि ती रंगलीही छान. श्रोत्यांमध्ये मामासाहेब घुमरे, महेश एलकुंचवार यांच्यासारखी मंडळी होती. हे सगळं अविश्वसनीय वाटत होतं कारण हे सर्वच माझे 'मेन्टॉर' असल्यानं माझ्यासाठी नागपूरचा कार्यक्रम स्वप्नपूर्तीच ठरला. नंतर कायम ठसठसत राहणारी जखम करून भोळे गेले. भोळेसरांचा हा शेवटचा जाहीर कार्यक्रम ठरला.

'डायरी' प्रकाशित झाल्यावर महाराष्ट्राच्या अक्षरशः कानाकोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला. पहिल्या चार साडेचार महिन्यांनंतरच राज्याच्या वेगवेगळ्या भागांत 'डायरी' कुठे मिळेल, याचा शोध सुरू झाला. इतक्या त्वरेनं 'डायरी'च्या प्रती संपल्या. आता ग्रंथालीच 'डायरी'ची दुसरी आवृत्ती प्रकाशित करत आहे. वर्षभराच्या आत पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित व्हावी हे कोणाही लेखकाला समाधान देणारंच आहे. 'डायरी'तल्या मजकुराबद्दल प्रामुख्यानं तरुण पत्रकारांचा प्रतिसाद प्रश्नांकित असायचा तर पत्रकारितेशी संबंधित नसणाऱ्या वाचकांना माझं पूर्वायुष्य कळल्यावर खूपच वाईट वाटायचं. माझी आजची जीवनशैली बघणाऱ्यांना तर इतकं अभावग्रस्त जीवन माझ्या वाट्याला आलं याबद्दल अतिशय खंत वाटायची. अक्षरशः अनेकांच्या प्रतिसादातून ती व्यक्त झाली. असं जीवन वाट्याला आलेल्यांना तर मी खूप जवळचा वाटू लागलो. एक सहकारी तर 'बिटविन द लाइन्स' वाचल्यावर घळाघळा रडला... खरं तर, जसं जगलो तसं थोडक्यात पण प्रामाणिक सांगण्याचा प्रयत्न मी केलेला होता आणि त्याचं भांडवल करण्याचा हेतू तेव्हाही नव्हता आणि कधीच असणार नाही. पत्रकारितेत आलेले अनुभव 'डायरी' म्हणून कथन करताना विचारवंतांचा आव मी कधी आणला नाही किंवा आपल्याला काहीतरी मार्गदर्शन किंवा उपदेश करण्याच्या प्रेषिताच्या भूमिकेतून लिहिलं नाही. जे अनुभवलं होतं ते अतिशय प्रामाणिकपणे शब्दबद्ध केलं. हे अनुभव काहीसे वेगळे होते आणि त्याला ललितबंधाची झालर लावलेली होती, हे मात्र खरं. तथापि त्यातून आपण काही सर्जनशील साहित्यकृती निर्माण करत आहोत अशी पोजही मी कधी घेतली नव्हती. हा प्रामाणिकपणा कदाचित वाचकांना भावला असावा आणि त्यामुळेच 'डायरी'ला चांगला प्रतिसाद मिळाला असावा, असं वाटतं. 'डायरी'ला एकेकाळी मी ज्यांच्या हाताखाली काम करण्याचं स्वप्न बघितलं ते विद्याधरक गोखले यांच्या नावाचा मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुरस्कार मिळाला हे खूपच सुखावणारं होतं. देवयानी प्रकाशनचा राम गणेश गडकरी पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचा माडगूळकर पुरस्कार हेही आश्चर्याचे सुखद धक्केच होते. कारण, या तीनपैकी कोणत्याही पुरस्कारा-साठी ना मी अर्ज पाठवला होता ना ग्रंथालीनं! देणाऱ्यांनी अतिशय सन्मानानं हे पुरस्कार दिले. त्यांविषयी म्हणूनच कृतज्ञ आहे.

'डायरी'ची पहिली इनिंग 'लोकसत्ता'च्या पीचवर झाली. आता 'लोकप्रभा'तून 'डायरी' भाग दोन जूनपासून प्रकाशित होत आहे. 'लोकप्रभा'तला कॉलम सुरू झाल्यावर ग्रंथालीनं प्रकाशित केलेली 'डायरी' बाजारात उपलब्ध नाही हे कटाक्षानं जाणवू लागलं. या पार्श्वभूमीवर दुसऱ्या आवृत्तीला मिळणारा प्रतिसाद कसा असेल याविषयी उत्सुकता आहे. 'लोकप्रभा'तील मजकुराला मिळालेला प्रतिसाद अविश्वसनीय आहे. आयटी, मॅनेजमेंट वगैरे क्षेत्रांतील तरुण मंडळींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल ज्या संवेदनशीलतेनं प्रतिसाद दिला आहे तो थक्कच करणारा आहे. या सर्वांना शेतकऱ्यांना मदत करायची आहे आणि त्यासाठी मी त्यांना अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रभाकर वैद्य यांचा संपर्क उपलब्ध करून देण्याचे मेल पाठवून अक्षरशः थकलो आहे! 'डायरी' भाग एक पाठोपाठ भाग दोनही प्रकाशित करण्याचा संकल्प आहे.

**प्रवीण बर्दापूरकर**

praveen_bardapurkar@hotmail.com

**डायरी**

**प्रवीण बर्दापूरकर**

**मूल्य : १८० रुपये**
**सवलतीत : ११० रुपये**

# लढा

## श्रीकांत पेटकर

नवीन कारखाने, धरणं वा विद्युत केंद्रं उभारायची तर त्यासाठी जमिनी संपादन करणं, त्यानंतर गावकऱ्यांचं विस्थापन, त्यानंतर विरोध, धरणं, संप, अडथळे अन् सगळ्यातच मग राजकारण. आपण मध्यमवर्गीय, नोकरदार माणसं शहरात बसून, पेपरात बातम्या वाचून यावर आपली मतं ठरवत असतो. कधी सरकारला तर कधी गावकऱ्यांना दोष देत चर्चा करत असतो.

पण स्वतःचा मुद्दा शेवटपर्यंत जनतेपुढे, सरकारपुढे मांडत, प्रसंगी स्वतःच्या कुटुंबाकडे, घराकडे दुर्लक्ष करणारे लोक बघितले की, माझं डोकं अशापुढे झुकतंच झुकत. मला जगण्याला नवी दिशा, उत्साह देतं. वाटतं, जग अशा काही लोकाच्या चांगुलपणामुळे तर तरत नाही ना!

आशियातील सर्वात जास्त प्रदूषण असणारं गाव चंद्रपूर असावं. शहराच्या चारही बाजूंनी कोळसा खाणी, सिमेंट कारखाने व एका बाजूला विद्युतकेंद्र. चोवीस तास आकाशात धूर. धूळ सोडणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीमुळे शहरातील रस्ते, घरे, दुकाने या सर्वांवर रोजच कोळशाच्या पावडरचा थर बसत असतो. चंद्रपुरातील सर्व डॉक्टरांकडे येणाऱ्या पेशंटांपैकी सर्वांत जास्त पेशंट श्वसनाच्या संबंधित असतात. तरी लोक कोळशाच्या पावडरच्या प्रदूषणाचे विष रोज शरीरात घेत जगत आहेत. ज्यांना शक्य आहे ते शहर सोडून इतरत्र स्थलांतरित होत असतात. अशा या चंद्रपूरच्या बाजूला आरवली टेकडी नावाचे गाव होते. त्या गावाची गोष्ट किंवा आता नसलेल्या गावाची गोष्ट.

वर्षांपूर्वी जेव्हा वेस्टर्न कोल्ड फिल्ड कंपनीला या गावाखाली दगडी कोळसा आहे असं आढळलं. गावकऱ्यांना विस्थापित करून तिथं कोळशाची खाण काढण्याचं ठरलं. आजोबा, पणजोबा किंवा त्यांच्याही आधीपासून पिढ्या न् पिढ्या राहणाऱ्या लोकांना गाव सोडायला सांगितलं गेलं. त्याबद्दल नोकरी वा रकमा देऊन मोबदला देण्याचं कबूल करण्यात आलं. गावकऱ्यांना हे पटत नव्हतं – गाव सोडण्याचं. कुणालाही गाव सोडायचं नव्हतं. गावकऱ्यांच्या मागण्यांना सरकारी कार्यालयात, आमदार, खासदारांपर्यंत पोहचवण्याकरता गावकऱ्यांनी पुढारी ठरवलं ते नगराळेगुरुजींना (नाव बदललेलं नाही). तहसील कार्यालय, जिल्हा कार्यालय अशा कार्यालयांत गुरुजी गावकऱ्यांची, स्वतःचीही बाजू मांडत होते. गावचा भाग सोडून दुसरीकडे काही अंतरावर खाण काढावी, पण गाव उठवू नये अशी गुरुजींची भूमिका होती. सुरुवातीला तहसीलदार, आमदार हे सर्व गावकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही असं सांगत होते. पण कोळशाची खाण होणार हे नक्की होतं. गुरुजी हरतऱ्हेचे प्रयत्न करत होते. पण...

दिवस जात होते, तसं गावातील एक एक घर कमी होऊ लागलं होतं. कुणाला वेकोफिमध्ये नोकरी तर कुणाला इतरत्र जागा वा घरासाठी रक्कम मिळत होती.

दिवस, वर्षं जात होती तशी गावातील घरं, नंतर गावातील विद्युत खांब, नळाचं कनेक्शन सारं कमी होऊ लागलं. शाळा, दवाखाने सर्व इतरत्र स्थलांतरित झाली.

गुरुजी कोर्टकचेऱ्या करतच होते. सुरुवातीला गुरुजींना आगे बढो म्हणणारे गावकरी, गुरुजींना पुढे ठेवून परस्पर मागच्या मागे पैसे घेऊन स्वार्थासाठी लढा अर्धवट सोडून गेले.

काही लोकांना कमी मोबदला मिळत होता. त्यांनी तो नाकारला व गुरुजींच्या लढ्यात चिकटून राहिले.

गुरुजींची मुलंही गुरुजींना मिळेल तो मोबदला घ्या व चंद्रपूरला राहायला चला असं सांगत. पण गुरुजींना लढा अर्धवट ठेवायचा नव्हता.

दहा–बारा घराचं गाव उरलं होतं. बाजूला कोळशाखाणीचं काम सुरूच होतं. ट्रक्स, ट्रॅक्टर, ब्लास्टिंगमुळे गाव पूर्णतः काळं झालेलं. सारखा आवाज, घरं सर्व खिळखिळी झाली होती. तरीही लोक राहत होते. कोळशाच्या, धुळीच्या सान्निध्यात.

एकेक घर रिकामं होत होतं. खोदकाम गुरुजींच्या घराजवळ येत होतं. कामामुळे घराला हादरे बसत. त्यावेळी घराबाहेर यावं लागे. गुरुजी आपल्या एका घरासह लढत राहिले.

आता गुरुजींच्या लढ्यात साथ उरली फक्त पत्नीची. मुलं, मुली तर शहरात राहत होती. मध्यंतरी मुलीनं गळफास लावून आत्महत्या केली. गुरुजींना दोष देत. तरी गुरुजी लढतच होते.

गुरुजींच्या पत्नीला, गुरुजींची साथ ठेवल्यामुळे म्हणा की काही म्हणा, श्वसनाचा कसलासा आजार जडला. सतत खाकलायची. कोळशाच्या खाणीतील धुळीमुळे हा आजार जडला. एक दिवस ती बिचारी मरण पावली अन् गुरुजींनी हाय खाल्ली. गुरुजींची तब्येत बिघडली.

मुलांनी गुरुजींना चंद्रपुरात आणलं. आरवली टेकडी गावातील घर वेकोफिनं दिलेल्या मोबदल्यात विकलं.

गुरुजी काहीही करू शकले नाहीत. गुरुजींचा लढा मुलांनी एका झटक्यात संपवला. आता तिथं एकही घर नाही.

मागील आठवड्यात गुरुजींना भेटून

पान २१ वर

# समाजातील परस्परावलंबन

सु.गो. तपस्वी

'जनसंवाद' हा एक वैचारिक गट आहे; धर्मनिरपेक्ष आणि पक्षनिरपेक्ष राहून समाजातील शक्तिसामर्थ्य संघटित करणारा. सुसंस्कृत व सक्षम समाजाचं स्वप्न बाळगणारा. संवेदनशील व सत्प्रवृत्त समाजमनाला हाक देणारा आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे संविधानातील लोकशाही मूल्यं केंद्रस्थानी मानणारा. सामाजिक बांधिलकी आपल्यापासूनच सुरू होते हे ठसवणारं हे निरीक्षण.

रमाकांत पेडणेकर सेंट्रल रेल्वेत नोकरी करतात; सध्या त्यांचं पोस्टिंग झालं होतं दादर स्टेशनच्या एका तिकीट विंडोवर. तिकिटासाठी रांगेत उभे असलेले प्रभाकर देसाई तिकीट खिडकीसमोर येत नाहीत तोच पेडणेकरांचा मोबाईल वाजायला सुरुवात झाली. पेडणेकरांनी नंबर बघितला. फोन वकिलांचा होता. ''एक मिनिट हं'' असं म्हणत, मोबाईल कानाला लावून पेडणेकर जागेवरून उठले आणि त्यांनी देसाईंकडे पाठ करून मोबाइलवर बोलण्यात गुंतले.

ऑफिसाला पोचल्यावर 'लेट कमिंग'च्या रजिस्टरवर सही करताना प्रभाकर देसाई मागच्या माणसाला सांगत होते, ''पर्वा नाही साल्यांना, मोबाईलवर कुचूकुचू बोलत बसतात. आज माझी रोजची कॉन्ट्रॅक्ट बस चुकली. लेट व्हायला नको म्हणून गर्दी असली तरी लोकलनं यायचं ठरवलं. तिकिटाच्या खिडकीवरच्या क्लार्कनं मात्र फोनवर बोलत राहून माझ्या दोन गाड्या चुकवल्या.''

अर्ध्या तासानंतर कस्टमर्ससाठी बँक उघडली तेव्हा देसाई आपल्या कॅश काऊंटरवर जाऊन बसले. देसाईंच्या ब्रँचमध्ये तीन कॅश काउंटर आहेस. पहिला चेक वा कॅश जमा करण्यासाठी, दुसरा देण्यासाठी आणि तिसरा फक्त वीस हजारांच्या वरच्या रकमांच्या देवीघेवीसाठी. दुपारी पाऊण वाजण्याच्या सुमारास सोनल मेहता रांगेत येऊन उभ्या राहिल्या; तेव्हा त्यांचा नंबर सहावा होता.

एक ते अडीच हा बँकेचा लंच टाइम असतो. परंतु कस्टमर्सची गैरसोय होऊ नये म्हणून ते तीन कॅशिअर एकेक करून अर्ध्या तासाच्या अंतरानं जेवायला जातात. थोडक्यात, लंच टाइममध्येसुद्धा किमान दोन खिडक्या चालू राहतात. तिन्ही खिडक्यांवर संगणक उपलब्ध असल्यामुळे लंच टाइमदरम्यान प्रत्येक खिडकीवर देवघेवीचे सर्व व्यवहार होऊ शकतात; लंच टाइममध्येसुद्धा बँकेची ती सर्व्हिस खंडित होत नाही!

सोनल मेहतांच्या पुढे उभ्या असलेल्या व्यक्तीचा चेक प्रभाकर देसाईंनी घेतला आणि मेहतांसह रांगेत उरलेल्या दोन जणांना एक नंबरच्या खिडकीवर जायला सांगून देसाईंनी आपली खिडकी जेवणासाठी बंद केली. सोनल मेहतांची दहा-पंधरा मिनिटं वाया गेली, कारण नव्या रांगेत परत त्यांचा नंबर लागला तो सहावाच! ह्यांची चडफड झाली असणार, पण त्यांचा स्वभाव मास्तरणीचा असल्यामुळे कदाचित त्या नव्या रांगेत निमूटपणे हलल्या व चूपचाप उभ्या राहिल्या असाव्यात.

सोनल मेहता शाळेत गणित शिकवतात; नववी आणि दहावीच्या वर्गाला. मेहतांचा क्लास खूप नावाजलेला आहे. त्यांचं क्लासमधील शिकवणं उत्तम मानलं जातं. क्लासच्या बहुतेक विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेत नव्वद टक्क्यांच्या वर गणितात मार्क मिळतात. त्यांच्या शाळेतील मुलांना मेहता क्लासमध्ये प्रवेशासाठी अग्रक्रम देतात. यंदा तर क्लासमधील चाळीस विद्यार्थ्यांपैकी सत्तावीस विद्यार्थी त्यांच्याच शाळेतील होते; अजय प्रधान हा त्या सत्ताविसांतील एक हुशार मुलगा.

अजय प्रधानच्या वडिलांचा दवाखाना आहे; डॉ. प्रधान छातीच्या आजारा-संबंधातील स्पेशालिस्ट आहेत. डॉ. प्रधानांची बहीण म्हणजे रेवती कर्णिक; त्या रेडिओलॉजिस्ट आहेत. प्रधानांचे पेशन्ट एक्स-रे काढण्याकरता डॉ. कर्णिकांच्या शेजारच्या लॅबमध्येच जातात.

तरुण चौधरी हा पंधरा वर्षांचा मुलगा डॉ. प्रधानांचा गेल्या दोन वर्षांपासूनचा पेशंट होता. त्याला बऱ्याचदा सर्दी-खोकल्याचा त्रास व्हायचा. कधी एक्स रे, कधी औषधं आणि कन्सल्टिंग फी. तरुणच्या वडिलांचे, अशोककुमार चौधरींचे तरुणच्या आजाराप्रीत्यर्थ महिन्या-दोन महिन्यांनी दोन-चारशे रुपये खर्च व्हायचे. चौधरी वकील होते आणि चेनस्मोकर होते. खरं बघता, घरातील सिगरेटच्या धुराचा व तरुणच्या सर्दी-खोकल्याच्या संबंधाचा संशय डॉक्टर प्रधानांना यायला हवा होता, पण ती बाब काहीशी दुर्लक्षितच राहिली!

ॲडव्होकेट अशोककुमार चौधरींकडे मुंबईतील जुन्या चाळींच्या संदर्भातील बरीच

कामं असतात. काही भाडेकरूंची तर काही कॉर्पोरेशनची. पावसाळ्याच्या तोंडावर जास्त कामं असतात ती 'बिल्डिंग राहण्यायोग्य नाही' हे नजरेस आणून देऊन पुढील कारवाईसाठी कॉर्पोरेशननं दिलेल्या नोटिशींची. या संबंधात कॉर्पोरेशनतर्फे काम बघायचे त्या वकिलाचे नावं होतं ॲडव्होकेट शर्मा.

त्या सकाळी ॲडव्होकेट चौधरी आणि ॲडव्होकेट शर्मा भेटले होते ते एका 'भिजत पडलेल्या घोंगड्यावर' चर्चा करायला. ते प्रकरण होतं कॉर्पोरेशननं रिकामी करायला सांगितलेल्या पेडणेकरांच्या चाळीचं. वडिलांच्या पश्चात त्या चाळीत रमाकांतची मालकी होती चार आण्यांची आणि कुटुंबाचा कर्ता म्हणून रमाकांत पेडणेकरांनी ती केस ॲडव्होकेट चौधरींकडे सोपवली होती.

बरोबर ओळखलंत! कामाकडे दुर्लक्ष करून सकाळी जो फोन रमाकांत पेडणेकरांनी घेतला होता तो चौधरी वकिलांचाच होता. त्या फोनमुळेच प्रभाकर देसाईंचा 'लेट मार्क' लागला.

देसाईंनी सोनल मेहतांच्या वेळेची पर्वा केली नव्हती म्हणून मेहतांची दहा-पंधरा मिनिटं फुकट गेली.

शाळेपेक्षा खाजगी क्लासेसवर तर मेहतांचं जास्त लक्ष नव्हतं ना? हुशार अजय प्रधानला एरवी क्लासची गरज पडली नसती अन् डॉ. प्रधानांना दोन हजारांचा गंडा दरमहा पडला नसता.

सिगारेटच्या धुराची तरुणला ॲलर्जी आहे हे डॉ. प्रधानांच्या लक्षात यायला हवं होतं. असं म्हणता येईल, की डॉ. प्रधानांच्या दुर्लक्षामुळे तरुणला त्रास सोसावा लागत होता आणि त्याच्या वडिलांना, ॲडव्होकेट चौधरींना जास्तीच्या खर्चात पाडलं होतं.

ॲडव्होकेट चौधरी व ॲडव्होकेट शर्मा संगनमतानं जी केस 'लढत' होते त्या संगनमताची झळ रमाकांत पेडणेकरांना पोचत होती.

असं हे आमचं, आम्हीच निर्माण केलेलं दुष्टचक्र आहे. ते कोण व कसं भेदणार?

गंमत बघा, अशा त्रासांना शासन-प्रशासन-राजकारणी-गुंड वगैरे कोणीही जबाबदार नसतं. तसंच, व्यवस्था-पद्धती-नियम-तंत्रज्ञान-यंत्रसामग्री इत्यादींच्या कमतरतेमधूनही असे त्रास उद्भवत नाहीत. अशा त्रासांना आमचीच वागणूक कारणीभूत ठरते.

जीवनातील मुख्य अडचणी अशाच रोजच्या जगण्यातील छोट्या छोट्या गोष्टींबाबत असतात. प्रत्येकानं स्वतःच्या कामाचा रास्त अभिमान बाळगून ते उत्तम रीतीनं केलं आणि समोरच्याचा थोडा जरी विचार केला तरी रोजचं जीवन सुखाचं होईल, पण लक्षात कोण घेतो?

सामाजिक बांधिलकी हे असंच एक महत्त्वाचं मूल्य!

समाज छोटा होता तेव्हा लोक एकमेकांना ओळखत होते आणि बांधिलकी जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करावा लागत नव्हता; आपण आजही अनुभवतो की ओळख असेल तर कामं पटकन होतात!

आजच्या फाफटपसाऱ्यात आपलं अवलंबन एकास-एक असं नसतं आणि समोरच्याला आपण ओळख नसतो. 'माझा ह्या व्यक्तीशी, त्याच्या गरजेशी संबंध काय?' असं म्हणून आपण दूर होतो. खरं तर, आपण सारेच एकमेकांवर अवलंबून असतो. त्रयस्थपणे होणाऱ्या आपल्या कामात मात्र जिव्हाळा नसतो- दुसऱ्या बाजूचा विचार (एम्पथी) नसतो. देणारा तत्पर नसतो आणि लाभार्थीलाही चांगली सेवा देणाऱ्याचं कौतुक नसतं!

भारतानं लोकशाही जवळ केली, पण आपण भारतीय मात्र अजूनही सरंजामशाहीच्या मानसिकतेत अडकून पडलो आहोत. आपल्या अनेक सामाजिक समस्यांचं मूळ ह्या विरोधाभासात आहे.

गरजेचं सामाजिक परिवर्तन साधण्याकरीता योग्य मार्ग निवडण्यासाठी 'जनसंवाद'चा शोध चालू असतो आणि जाणीवजागृती हा त्या मार्गावरील पहिला मैलदगड मानला पाहिजे!

जाणीवजागृतीसाठी गेल्या वर्षी 'जनसंवादनं' दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून 'सामाजिक मूल्ये' ह्या विषयावर एक राज्यव्यापी स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेच्या यशामुळे ह्या वर्षीही 'जनसंवाद' एका स्पर्धेचं आयोजन करत आहे. ह्या वर्षीचा विषय आहे, 'सामाजिक बांधिलकी'.

स्पर्धेची घोषणा व स्वरूप निवडक दिवाळी विशेषांकांतून स्पष्ट होईल. त्या विशेषांकांत गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही 'रुची' सहभागी होत आहे. स्पर्धेत भाग घेऊन जनसंवादच्या जनजागृती उपक्रमाला यशस्वी करावं, हेच वाचकांना आवाहन!

जनसंवादचं घोष वाक्य आहे

**आपण नाही तर कोण,**
**आता नाही तर केव्हा?**

**सु.गो. तपस्वी**
समन्वयक, जनसंवाद
suhas@fandsindia.com
मो. नं. ९७६६१५२२५३

**पान १९ वरून**

आलो. गुरुजी आता कुणाला फारसे ओळखत नाहीत. फक्त मुलगा, सून नातवंडांना ओळखतात. पातळ पेज, फळाचा रस यावर गुजराण सुरू आहे. मला फार वाईट वाटले.

पण अभिमानही वाटत होता गुरुजींबद्दल. जोंवर स्वतःच्या पायावर वा भानावर होते तोपर्यंत बेभान होऊन लढाई लढले. आयुष्याचं सार्थक केलं.

ध्येय जे ठरवलं त्या मार्गावर चालत राहिले, सोबत कुणी असो वा नसो.

अवतीभवती अजूनही असे लोक आहेत तर !

(लेख 'रुची'कडे पाठवला आणि गुरुजी गेल्याची दुःखद बातमी आली. मी मनोमन त्या एकांड्या शिलेदाराला प्रणाम केला.)

**श्रीकांत पेटकर**
मो. नं. ९७६९२१३९१३

# शिक्षक-विद्यार्थ्यांची पुस्तकभिशी

## वेच्या रुध्या गावीत

शिक्षकीपेशा हे एक जीवनव्रत आहे, अशी श्रद्धा असणाऱ्या शिक्षकांचा एक वर्ग अजूनही कार्यरत आहे. असे जीवनव्रती शिक्षक आपापल्या जागी, असेल त्या साधनसामग्रीचा वापर करून, निराश न होता आपल्या अध्यापनाचे काम आनंदाने आणि निरपेक्ष वृत्तीने करत आहेत. त्यांचे एकाकीपण दूर करून त्यांच्या सर्जनशील कौशल्याचे सार्वत्रिकीकरण घडवून आणण्यासाठी, तसेच प्राथमिक शिक्षणात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या जीवनव्रती शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व अधिक फुलावे यासाठी 'शिक्षक पुस्तकभिशी' उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

शिक्षकाला नव्या पिढीच्या संगोपनाबरोबर संस्कृतीच्या संरक्षणाचेही कार्य करायचे असते. संस्कारप्रक्रियेचे मानसशास्त्रीय स्वरूप लक्षात घेता शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व ही महत्त्वाची बाब आहे. शिक्षकांनी आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याचा प्रयत्न करायला हवा. शिक्षकाची प्रतिष्ठा त्याच्या कार्यावर अवलंबून आहे. त्यांनी स्वत:ची व स्वत:च्या व्यवसायाची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी आचारसंहिता बनवून तिचे पालन करणे अगत्याचे आहे, कारण शिक्षणाची ध्येये व अभ्यासक्रम यांना मूर्त स्वरूप देण्याची अखेरची जबाबदारी शिक्षकांवरच येऊन पडते. परंतु त्यालाच जर हे माहीत नसेल तर तो मूर्त स्वरूप देईल तरी कसा? अभ्यासक्रमाचे महत्त्व प्रथम शिक्षकांना समजले पाहिजे. त्यावर त्याची श्रद्धा असली पाहिजे. ज्या विचारभावनांनी शिक्षक भारलेला असेल तेच विचार व कल्पना तो विद्यार्थ्यांना संक्रमित करू शकतो. म्हणून



वेच्या रुध्या गावीत

समविचारी शिक्षकांनी एकत्र येऊन 'शिक्षक पुस्तकभिशी' सुरू करावी असा विचार पुढे आला. शिक्षकांनी शासनाकडून कोणतीच अपेक्षा न ठेवता, स्वत:च पुढाकार घेऊन स्वत:चे व्यक्तिमत्त्व फुलवण्यासाठी संघटित होणे हाच उपाय योग्य आहे. हे लक्षात घेऊन शिक्षणक्षेत्रातील धडपडणाऱ्या शिक्षकांनी गावोगावी एकत्रित यावे, चर्चा कराव्यात, पुस्तके वाचावीत, कला-साहित्याचा आस्वाद घ्यावा, शैक्षणिक समस्यांवर चर्चा करावी, शैक्षणिक उपक्रमांचे आदानप्रदान करावे, शिक्षकांची संमेलने-सभा घ्याव्यात आणि हे सारे अनौपचारिक असावे अशा विचारातून एकमेकांचे व्यक्तिमत्त्व फुलवायला एकमेकांना मदत करावी हाच शिक्षक पुस्तकभिशी सुरू करण्यामागचा उद्देश आहे.

**पुस्तकभिशीची उद्दिष्टे –**

१)शिक्षकाची वाचनाभिरुची वाढेल.
२)शिक्षकांचे एकटेपण जाऊन स्व-विकासासाठी प्रोत्साहन मिळेल.
३) शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाला व्यासंगाची जोड मिळेल.
४) सामाजिक बांधिलकीचे नवे भान येईल.
५)विविध कलांच्या आस्वाद व रसग्रहणासाठी सौंदर्यदृष्टी तयार होईल.
६)मुलांच्या शिकण्यासंदर्भातल्या अडचणी व त्यावरील उपाय यावर चर्चा होईल.
७)विद्यार्थ्यांच्या मानसिक भरणपोषणासाठी विविध प्रयोग करता येतील.
८)शिक्षकाकडे बघण्याचा समाजाचा, अधिकाऱ्यांचा, राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन बदलेल.
९)शिक्षकाकडे स्वत:चे पुस्तक संग्रहालय तयार होईल.

या भावनेतून कर्जत तालुक्यात दहा शिक्षकांनी मिळून वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी दसऱ्यानिमित्त ९ ऑक्टोबर २००८ रोजी 'शिक्षक पुस्तकभिशी' हा अभिनव उपक्रम सुरू केला.

**अशी होते भिशी–**

आम्ही दहा शिक्षक मिळून दरमहा १०० रुपये गोळा करतो. पुस्तके, नियतकालिके, आत्मचरित्र, वैज्ञानिक, सामाजिक, शैक्षणिक, नवीन विचारप्रवाह, शैक्षणिक, नवीन विचारप्रवाह, शैक्षणिक घडामोडींवर आधारित अशी शिक्षक व्यक्तिमत्त्व विकास करणारी पुस्तके मी खरेदी करतो. ठराविक महिन्यातील दिनविशेषाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील, तसेच शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, कवी व इतर मान्यवर यांच्या हस्ते नियोजित कालावधीत 'शिक्षक पुस्तकभिशी' काढली जाते.

आतापर्यंत १५ पुस्तकभिश्या काढल्या

असून २२२ पुस्तकांचा संग्रह (१९,५२९ रुपये किंमतीचा) शिक्षकांकडे तयार झाला आहे. त्यामुळे शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे 'शिक्षक वाचनालय' स्वत:च्या घरी, स्वत:च्या मालकीचे तयार झाल्याने वाचनसंस्कृती जोपासली जात आहे. ज्या शिक्षकास पुस्तकभिशी लागली आहे त्याने त्याच्या आवडीच्या एका पुस्तकाचे समीक्षण करून पुढच्या सोडतीच्या वेळी मनोगत व्यक्त करण्यास सांगितले जाते. प्रत्येक भिशीला तज्ज्ञांची वाचनवेड रुजवणारी पुस्तके, माझे आवडते पुस्तक, वाचाल तर वाचाल, माझा आवडता साहित्यिक, शिक्षकाचे वाचन का, कसे, कोणते, शिक्षक व्यक्तिमत्त्व विकास करणारी पुस्तके, अशी व्याख्याने आयोजित करून तालुक्यातील इतर शिक्षकांनाही त्याचा लाभ दिला जातो.

काही शिक्षक केवळ अध्यापन करण्यापुरते वाचन करत असतात. पुस्तकी ज्ञानापेक्षा इतर ज्ञान त्यांच्याकडे नसल्यामुळे ते विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तराचे फारसे समाधान करू शकत नाही. 'आडात नाही तर पोहऱ्यात कसे येणार?' परिणामी, त्यामुळे विद्यार्थ्यांबाबत सखोल विचार करण्यास वाव मिळत नाही. वाचन अनन्यसाधारण महत्त्वाचे असताना देखील शिक्षक हवा तेवढा वेळ अवांतर वाचनासाठी देताना दिसत नाही. फावला वेळ वाचनासाठी खर्च न करता आजचा शिक्षक मनोरंजन, फिरणे, जोड व्यवसाय, कौटुंबिक समस्या आणि अन्य काही उद्योग करण्यास देताना दिसतात. त्यामुळे बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेता स्वत:मध्ये कोणकोणते बदल करावे हे त्याला स्वत:लाच समजत नसल्यामुळे आधुनिक काळाला अनुरूप आपला व्यवसाय समर्थपणे पेलण्यास तो असमर्थ ठरतो. एखादे पाठ्यपुस्तक शिकवायचे म्हटले तरी त्या पाठ्यपुस्तकापलीकडचा विचार, त्याच्याशी साम्य असणारी एखाद्या विषयाशी निगडित प्रश्न-उत्तरे तो वाचन नसल्यामुळे देऊ शकत नाही. आजचा विद्यार्थी अनेक ज्ञानसंवर्धन करणारी माध्यमे पाहत असल्यामुळे आपोआपच बऱ्याच गोष्टी शाळेत येण्याअगोदर शिकून आलेला असतो. त्यामुळे त्याला एका साच्यात बसणारे उत्तर अपेक्षित नसते. त्याच्या ज्ञानाची भूक भागवता येण्यासाठी शिक्षकाकडे चौफेर ज्ञान असायला हवे. ते शिक्षकाकडे कधी असेल? जेव्हा तो त्या गरजेला अनुरूप शोधकवृत्ती अंगी बाणेल तेव्हा. परंतु शिक्षक स्वत: अवांतर वाचन करत नसेल तर तो विद्यार्थ्यांनाही वाचण्यास प्रोत्साहन देताना दिसणार नाही. म्हणून म्हटले जाते 'वाचाल तर वाचाल'. ते सर्व शिक्षकांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

शिक्षक काय व कसे शिकवतो या प्रश्नांआधी तो कसा आहे हा प्रश्नही हल्ली अधिक महत्त्वाचा आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध कसे निर्माण होतात यावर त्याच्या पुढचे कार्य अवलंबून असते. विद्यार्थ्यांच्या मनावर शिक्षकाचा दृष्टिकोन व चारित्र्य यांचा नकळत ठसा उमटतो. शिक्षकांनी प्रत्यक्ष आचारविचार विषयककल्पना दिल्या-न दिल्या तरी शिक्षकाचे अनुकरण विद्यार्थी करतच असतात.

शिक्षकाच्या व्यवसायाचे काही वेगळेपण आहे. शिक्षकाच्या कार्याचे परिणाम दूरगामी असतात. बाह्य भौतिक जीवनापेक्षा आंतरिक जीवनाशी, भावविश्वाशी त्या कार्याचा संबंध अधिक असतो. विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा, तळमळ व प्रेम हे शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचे खास पैलू आहेत. प्रत्येक व्यक्तीला मूल्य व प्रतिष्ठा आहे ही लोकशाहीदृष्टी तर हवीच, पण त्याचबरोबर व्यक्तीच्या विकास सामर्थ्यावर व परिवर्तनशीलतेवर विश्वास आणि तो घडवून आणण्यासाठी दुर्दम्य आशावाद व चिकाटी हे गुणही शिक्षकात हवेच.

ज्यांना विद्यार्थ्यांबाबत प्रेम नसेल त्यांनी ह्या व्यवसायात पडू नये असे एका विचारवंताने म्हटले आहे. परीस फक्त लोखंडाचे सोने बनवतो, त्याला परिसत्त्व आणून देत नाही. खरा 'गुरू' आपली योग्यता तर शिष्याला प्राप्त करून देतोच पण तो आपणाहून सरस ठरावा अशीही आकांक्षा बाळगतो.

'शिष्यादिच्छेत पराजयम्!' अशी दृष्टी भारतात बाळगण्यात आली आहे. गुरू-शिष्य संबंध व शिक्षकाबद्दल आदर ही भारतीय संस्कृतीतील मूल्ये जपल्याशिवाय या व्यवसायाला खरी प्रतिष्ठा लाभणार नाही. तेव्हाच भारतीय संस्कृतीत ज्ञानोपासना व विद्यादान यामुळे गुरूला आलेले महत्त्व आजही उपयुक्त ठरेल!

येणाऱ्या पिढीसाठी आपण त्यांना आपला अभिमान वाटेल असा ठेवा मागे ठेवून जाणे हीच शिक्षकांची सर्वांत मोठी जबाबदारी आहे. पुस्तकभिशीतील कोणीही शिक्षक वेगळ्या गोष्टी करत नाहीत. ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात. तुम्हीही तुमच्या परिसरातील, केंद्रस्तरावर किंवा बिटस्तरावर, जवळपास राहणाऱ्या समविचार शिक्षकांचा गट तयार करा आणि पुस्तकभिशी सुरू करू शकता. आमच्या 'शिक्षक पुस्तकभिशीत' नव्याने २० सर्जनशील शिक्षकांच्या समावेश झालेला असून दरमहा तीन हजार रुपये किमतीची भिशी काढली जाते.

अशीच भिशी मी विद्यार्थ्यांसाठी सुरू केली. मुलांच्या खाऊसाठी मिळणाऱ्या पैशांतून महिना पाच रुपये मी जमा करतो व त्यातून त्यांच्यायोग्य पुस्तके खरेदी करून दरमहा भिशी काढली जाते. यात हळूहळू विद्यार्थीसंख्या वाढते आहे ही समाधानाची बाब वाटते.

**वेच्या रुध्या गावीत**
'गुरुवर्य' शिक्षक सोसायटी,
नानामास्तर नगर, मुद्रे-खुर्द-कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१
दूरध्वनी - ९२२६६८५०७६
भ्रमणध्वनी-८०८७५६५३९

## ‘भिडू’ पुस्तकावर सुशीलकुमार शिंदे यांची प्रतिक्रिया

दि. ०७-०७-२०१० बुधवारचा दिवस. सकाळी ९.४० चं लेक्चर घेऊन रिसेससाठी कॉलेजच्या स्टाफ रूममध्ये येऊन बसलो तर नेमका योग्य वेळी मोबाईल वाजला. कानाला लावला. अनोळखी आवाज, ‘‘हॅलो, दिल्लीवरून बोलतो. भगवान इंगळे ना आपण?’’

‘‘हो. आपण?’’

‘‘तुमच्याशी सुशीलकुमार शिंदे साहेबांना बोलायचंय. मी त्यांचा पी.ए.’’

‘‘हो. द्या ना.’’

त्यांनी फोन लावून दिला. मी नमस्कार केला. शिंदेसाहेब म्हणाले,

‘‘तुमचं ‘भिडू’ वाचलं. पुस्तकाचा समारंभ कधी झाला?’’

‘‘साहेब ग्रंथालीच्या वाचकदिनी २५ डिसेंबर २००९ रोजी झाला. प्रथम ‘उदई’, ‘भिडू’ आणि चार कवितासंग्रहांचे एकत्र प्रकाशन झाले आणि कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात ‘गांगल ७०- ग्रंथाली ३५’ या वैशिष्ट्यपूर्ण महत्त्वाच्या ग्रंथाचे प्रकाशन तुमच्या हस्ते झाले होते.’’

‘‘हो. त्यावेळी मी भाषणात तुमच्या ‘ढोर’चा उल्लेख केला होता. आता तुमचे ‘भिडू’ बारकाईने वाचले. बार्शी, सोलापूरकडे सामान्य लोक मोटर नाही, मोटार म्हणतात. मी पुस्तकात तशा खुणा करून ठेवल्या आहेत. त्यातल्या सुरेख म्हणी, वाक्प्रचार, बोलीभाषेतले जिवंत हुबेहुब संवाद. भिडूतला सामाजिक आशय काळजाला भिडणारा आहे. तो चिंतनाचा विषय आहे. मी सोलापूरला ‘भिडू’वर मोठा कार्यक्रम घेतो! मला आवडले आहे.’’

‘‘हो साहेब. जरुर घ्या. मी आपला आभारी आहे.’’

आणि फोन कट झाला.

**– भगवान इंगळे**





# भिडू

**भगवान इंगळे**


**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**



## पंखाविना भरारी

**शरयू घाडी**

**मूल्य : २०० रुपये**
**सवलतीत : १२० रुपये**





शरयू नागेश घाडी ह्यांस,

‘चिरंजीव’ प्रसाद घाडी ह्या एका जगावेगळ्या सुपुत्राची जीवनकहाणी आपण अतिशय हृद्य स्वरूपात प्रकाशात आणली आहे. आपल्या कुटुंबाने ह्या सर्व कालखंडात ज्या सकारात्मक दृष्टीने वाटचाल केली त्यातून अनेकांना प्रेरणा मिळेल.

**श्रीरंग गोडबोले**
इंडियन मॅजिक आय प्रा. लि.
टायकलवाडी मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

---

शरयू नागेश घाडी ह्यांस,

नुकतेच ‘पंखाविना भरारी’ हे पुस्तक आम्हां उभयतांच्या वाचण्यात आले, आणि अंत:करण अक्षरश: हेलावून गेले. त्याचबरोबर आयुष्याच्या संध्याकाळी आमच्या थकलेल्या पंखात बळ आले!

नियतीने भयानक अविष्कार, चि. प्रसादच्या रुपाने तुमच्या ओटीत टाकला, पण त्याने त्याचे सोने केले. तुम्हां उभयतांनी सुद्धा नोकरी सांभाळून काहीही कसूर न ठेवता जे केलेत त्याला तोड नाही.

शिक्षण, संगीत, कविता, अभिनय, वक्तृत्व इ. अनेकविध कलांमध्ये केवळ प्राविण्यच नव्हे! तर त्याने प्रभुत्व प्राप्त केले. असा हा सर्वगुणसंपन्न मुलगा आपल्या संसारात दीपस्तंभाप्रमाणे ठाम होता. स्वत:च्या अगम्य जिद्दीवर मिळवलेला लौकीक त्याने सर्व तुमच्या पदरात रिता केला. त्यामुळे आईबाबांच्या नात्याला एक वेगळी झळाळी प्राप्त झाली. असा हा तेज:पुंज दिवा सतत २१ वर्षे तेवत होता.

‘स्वामी’ हे त्याचे टोपणनाव जरी होते, तरी तो ‘संत’ होता. मला तरी ह्या युगातील ‘ज्ञानोबा’ वाटला. (अर्थात, हे माझे वैयक्तिक मत आहे)

‘‘कारण नियतीला भिऊ नका. पण तिच्याशी मैत्री करा’’ असा मौलिक संदेश त्याने समस्त मानवजातीला दिला.

आमची शब्द पुष्पांजली चिरंजीव प्रसादला वाहून हे पत्र पुरे करतो. तसेच श्री. नागेश व सौ. शरयूला मनापासून सलाम करतो.

**अरविंद कर्पे**
पनवेल - ४१० २०६.